# संपादकीय...

लहानग्यांचे भावविश्व वेगळेच. यांच्या विश्वात रमणे तर आनंदच. म्हणूनच 'बालपण देगा देवा...' असं आपण म्हणत असतो. या बालवयातच संस्कार पडायला हवेत. त्यासाठी संस्कार कथांचा मार्गच सुंदर असायला हवा. या कथांशी तादात्म्य पावण्याचं भाग्य मुलांना लाभायला हवं आणि 'आबाची गोष्ट' या कथासंग्रहाने हे भाग्य कुमारांना लाभलेय याचा आनंद वाटतो.

आबा महाजन यांच्या 'आबाची गोष्ट' या कथा संग्रहातील सतरा कथांना संस्कारमूल्य आहे. ग्रामीण भागातील विशेषत: खानदेशातील अहिराणी भाषेच्या ओघवत्या शैलीने सहजच कथांशी एकरूप होता येण्याचं कौशल्य आबा महाजनांनी साधले आहे.

वास्तविक वाचनाचा संस्कार होणं काळाची गरज. वाचनासाठी राक्षस, परी या व्यतिरिक्त साहित्य घडायला हवं आणि यापलीकडे जाऊन आबांनी 'आबाची गोष्ट' साकारून बालसाहित्यात नव्या प्रयोगाची भर घातलीय. प्रशासकीय जबाबदारी सांभाळत बालसाहित्यात भर घालणाऱ्या आबा महाजनांनी 'आबाची गोष्ट' या कथासंग्रहाने वेगळीच उंची गाठलीय. म्हणून साहित्य अकादमीने देखील 'आबाची गोष्ट' या कथासंग्रहाला गौरवले.

असंच सुंदर बालसाहित्य आबा महाजन यांच्या हातून घडत राहो या सदिच्छेसह त्यांच्या संवेदनशील मनाला सलाम करावासा वाटतो.

-सुभाष कुलकर्णी

# अंतरंग

**...शुभेच्छा संदेश...**

श्रीकांत देशमुख

ऐश्वर्य पाटेकर

डॉ.विजया वाड


**साने गुरूजींच्या भूमीतला बालसाहित्यिक**

नरेंद्र लांजेवार / ७

**कष्टमय बालविश्वाची कथा आबाची गोष्ट**

डॉ.किसन पाटील / ११

**संस्कार सिंचनाच्या प्रेरणेतून आविष्कृत झालेला प्रयोगशील बालकथासंग्रह आबाची गोष्ट**

डॉ.फुला बागूल / १३

**साहित्य अकादमीने गौरविलेली : आबाची गोष्ट**

डॉ.अशोक कोळी/१५

**मुलांना गोष्टी सांगणाऱ्या आबांची गोष्ट**

जयवंत चव्हाण / १९

**आबा महाजन यांच्या बालसाहित्याला साहित्य अकादमीचे तोरण**

प्रा.बी.एन.चौधरी / २१

**आबाची गोष्ट सुरेख कथासंग्रह**

विलास पगार /२३

**किशोरांसाठी बोधप्रद कथासंग्रह**

गिरीष दुनाखे /२४

**कठीण परिस्थितीतून मार्ग काढायला शिकवणाऱ्या कथा**

बबन शिंदे /२६

**आबाची गोष्ट कथासंग्रह किशोरवयीन मुलांसाठी प्रेरक**

उमेश काटे /२८

**बालकांचे भावविश्व समृद्ध करणारा कथासंग्रह**

गोविंद कदम/ २९

**मुलांना अनुवादक बनविणाऱ्या आबाची गोष्ट**

युवराज माने/ ३१

**आबाची गोष्ट : कुटूंब शाळा मित्र त्रिघटकीयसार**

जगदीश पाटील/ ३३

**यशासाठी हवेत कष्ट हेच सांगते आबाची गोष्ट**

स्मिता सराफ/ ४१

समृद्ध शिक्षण संस्कारासाठी ...

मासिक

# शिक्षणयात्री

वर्ष : ६वे अंक: ६ वा जून २०२१

**वार्षिक:रू.४००/-** **द्वैवार्षिक:रू.७००/-**

**त्रैवार्षिक:रू.१०००/-**


मार्गदर्शक
मा.पुरुषोत्तम भापकर (भाप्रसे)

मानद संपादक
सुभाषदादा कुलकर्णी

अतिथी संपादक
शैलजा सोनवणे

उप संपादक
संदेश नंदकिशोर हजारे

संपादन सहाय्य
डॉ.दिपक बाविस्कर
डॉ.युवराज पवार

अंक जुळणी
प्रगती आर्टस्,शिरपूर धुळे

मुद्रितशोधन
डॉ.युवराज पवार

मुखपृष्ठ
अभिनेत्री सायली संजीव

मुखपृष्ठ मांडणी
परेश देवरे

**प्रतिनिधी सहाय्य**

**पुणे**- रमेश काळे,
**मुंबई**- जयपाल गिरासे,
**नाशिक**-किरण पाटील,
**सोलापूर**- उमेश काळे,
**औरंगाबाद**- रवि गारूडकर,
**परभणी**- युवराज माने,
**जळगांव**- प्रविण माळी,
**नंदुरबार**- तुकाराम धनगर,
**अमरावती**- रूपेश माने,
**कोल्हापूर** - गुलाब बिसेन,
**सातारा** - विनोद भोजने,
**बीड** - अनंत दिक्षित,
**लातूर** - पंढरीनाथ चिभडे,


**शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.**

**Online** पेमेंट साठी – खाते नाव–शिक्षणयात्री Shikshanyatri
बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No.13320200000322
IFSC Code : BARB0SHIRPU
वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे


संपर्क पत्ता– संपादक शिक्षण यात्री
क्रांतीनगर मु.पो.ता.–शिरपूर जि–धुळे ४२५४०५
(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)



लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी पीआरबी ॲक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्य.संपादकांची राहील सर्व दावे शिरपूर न्यायकक्षेंतर्गत.

# शुभेच्छा

प्रिय आबा महाजन,

आपण आठवणीने पाठवलेली आबाची गोष्ट टपालाने कालपरवा मिळाली. मुळात उत्तम बालसाहित्य मला फार आवडते. बालकथा, कविता वाचतांना, ऐकतांना मी रमून जातो. या उपेक्षित पण अतिशय महत्त्वाच्या वाड:मय प्रकाराकडे आवर्जून लक्ष देणारी नव्या पिढीतली लेखक मंडळी पहिली की खरेच बरे वाटते. तुमची एकूण लेखनसूची पाहिली तर तुम्ही किती भरघोस लिहिलेय मुलांसाठी हे दिसते. अगदी जाणीवपूर्वक असे लेखन करणे ही मोठी जोखीम असते,जी तुम्ही स्वीकारलीय आबाच्या गोष्टीची निर्मिती,चित्रे,मांडणी अतिउत्तम ! माझा मित्र सरदारची ही चित्रे।सरदार हा माझ्या आस्थेचा प्रिय विषय आहे अहिराणी,खान्देशी भाषा हा तुमचा जमेचा भाग जी तुम्ही यातही जोपासली किंबहुना तुम्ही या भाषेला टाळू शकणार नाही इतका तो तुमच्यासाठी अभिन्न असो मनःपूर्वक शुभेच्छा।

-श्रीकांत देशमुख

# शुभेच्छा

प्रिय आबा महाजन सर

आपला आबाची गोष्ट हा कथासंग्रह वाचला.खरंतर मन्हा गावले आणि मन्हा मामाना गावले जाऊ या आपल्या बालकविता संग्रहांतील कविता वाचताना मला प्रकर्षाने जाणवलं होतं की आपल्या कवितेत कथन आहे; तिच्यातून कथा पुढे पुढे सरकत जाते. थोडक्यात सांगायचं तर आपल्या कवितेत फार प्रभावी कथानक आहे. त्याच प्रभावी कथानकास तुम्ही आबाच्या गोष्टीतून मूर्त रुप दिलं आहे. आपली कथा सांगण्याची पद्धतच इतकी प्रभावी आहे की ती गुंगवून टाकते.हे नुसतचं लहान मुलांचं भावविश्व नाही; कारण कुठल्याही माणसात एक मूल सतत वास करत असतं. त्यामुळे लहान मुले ही कथा वाचताना जितके तन्मय होतील तितकीच मोठी म्हणवणारी माणसेही. हे आपल्यातल्या लेखकाचं यश आहे.अगदी प्रभावी संस्करण आपली कथा करते.बालसाहित्यातच नाही तर एकूण साहित्यात तिची नोंद घ्यावी इतकी आपली कथा तिचा विशेष प्रभाव साधून जाते.बालसाहित्यात आपण आपली ठळक ओळख निर्माण करण्यास कृषीसंस्कृतीचा मोठा वाटा आहे. हे मी आपल्या कविता वाचून आपणास कळविलेही होते; कृषीसंस्कृतीचा धागा आपण घट्ट धरून ठेवला.म्हणून आपल्या कथेला मातीचा वास आहे. तिच्या संवेदनेचा वावर कथासार पसरुन राहिला आहे. आपल्या सगळ्याच कथा उत्कृष्ट उतरल्या आहे पैकी गारपीट कथा प्रचंड भावली. आपली काव्यात्म भाषा कथेला उंचीवर घेऊन जाते यास गारपीट ही अपवाद नाही! उदा.गारपीटमधील हा शेवट अवकाळी गारांचा पाऊस जरी थांबला असला तरी गावकऱ्यांच्या अन गाय वासरांच्या डोळ्यांतून तो वाहतच राहिला... एकसारखा! या काव्यात्म शैलीने कथा विशेष उंची गाठते. सतरा कथांचा हा गुच्छ नक्कीच बालवाचकांबरोबर प्रौढ वाचकांच्याही निश्चितच पसंतीस उतरणार आहे याची ग्वाही देतो. बालसाहित्यातील आपलं वैशिष्ट्यपूर्ण स्थानही निश्चित करतो.

कळावे.

-ऐश्वर्य पाटेकर

# शुभेच्छा

आबा गोविंद महाजन हा तरुण मुलगा मला प्रथम भेटला तो त्याच्या अनवट अहिराणी बोलीतील कवितांतून, नि मी त्याच्या शब्दसंपदेच्या अक्षरश: प्रेमात पडले. आता आबाचा आबासाहेब झालाय पण आईच्या मायेने मजसाठी तो आबाच आहे.

'आबाची गोष्ट' या पुण्याच्या दिलीपराज प्रकाशनाने काढलेल्या बालकथा संग्रहातल्या सर्व कथा मी वाचल्या नि लक्षात आले, आबाच्या कथेला कारुण्याची झालर आहे, आईच्या मायेच्या गोधडीची ऊब आहे नि प्रयत्नवादाचा पुरस्कार करणारी आशेची शलाकाही आहे.

'प्रयत्नांती परमेश्वर' म्हणत आबा उच्चपदी पोहचला तरी गुराढोरांचे रान त्यांच्या मनभर परसले आहे. मी संपादित केलेल्या 'बालकोशा'त ही आबाचे कथा-काव्य योगदान आहे.

आबा,सुंदर भविष्य तुला हाकारते आहे पुकारते आहे. शब्दमंडल तुला तुझ्या इच्छित स्थानी नक्की पोचवेल. माणुसकीचा ओलावा जपत 'उंच' हो बाळ माझे पोतडीभर आशीर्वाद नि खूप प्रेम!

- डॉ.विजया वाड

# साने गुरुजींच्या भूमीतला बालसाहित्यिक आबा गोविंदा महाजन

नरेंद्र लांजेवार

२०२० या वर्षीचा बालसाहित्य अकादमीचा बालसाहित्य पुरस्कार श्री.आबा गोविंद महाजन यांच्या 'आबाची गोष्ट' या पुस्तकाला मिळाला आणि खांदेशच्या मातीचा, अहिराणी बोलीचा व सातत्यपूर्ण बालसाहित्य लेखनाचा सन्मान झाला आहे.संपूर्ण बालसाहित्याच्या क्षेत्रातून योग्य व्यक्तीची निवड झाल्याने आनंद व्यक्त करण्यात येत आहे. जळगाव जिल्ह्यातील एरंडोल मध्ये सालदाराच्या घरात जन्मलेल्या आबा गोविंद महाजन यांनी शिक्षक , नायब तहसीलदार ते तहसीलदार पदापर्यंत मजल मारली .त्यांनी बालसाहित्यात राज्य पुरस्काराची हॅट्रिक केल्यानंतर आबाची गोष्ट या कथासंग्रहावर बालसाहित्यातील साहित्य अकादमीची मोहोर उमटली. श्री. आबा गोविंद महाजन यांचे ग्रंथालीच्या वतीने अभिनंदन केल्यावर ते आपल्या जडणघडणी बद्दल भरभरुन बोलतं होते...ते म्हणाले, शिक्षक असताना साने गुरुजी ,बालकवी, बहिणाबाई चौधरी यांच्या साहित्याचा लळा लागल्यानंतर बाल साहित्य लिहिण्याचे ठरविले. वेगळ्या प्रयोगाची दखल निश्चितच घेतली जाईल असे मला वाटायचे .प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करणाऱ्या जिद्दी मुलांच्या या कथासंग्रहाची दखल साहित्य अकादमीने घेतल्याने मनस्वी समाधान वाटल्याचे आबा महाजन यांनी सांगितले. एरंडोल मध्ये सालदाराच्या कुटुंबात माझा जन्म झाला. 'आबाची गोष्ट' या कथासंग्रहातील सतरा कथांपैकी निम्म्या कथा एरंडोलच्या वातावरणातील खान्देशी बोलीत आहेत. प्राथमिक शिक्षण तेथेच झाले. नोकरी लवकर मिळण्यासाठी मी डी.एड केले. जामनेर व एरंडेल तालुक्यात प्राथमिक शिक्षक म्हणून काम केले. तेथे साने गुरुजी, बालकवी ,बहिणाबाई चौधरी यांच्या साहित्याचा लळा लागला. स्वतः मुलांसाठी लिहावे असे वाटू लागले. तेथूनच बालसाहित्याचा प्रवास खऱ्या अर्थाने सुरू झाला. १९९४ मध्ये माझी पहिली कविता किशोर मासिकात प्रसिद्ध झाली. सन २००१ मध्ये गमतीच्या राज्यात हे माझे पहिले पुस्तक महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेतून प्रकाशित झालो. त्याला अनेक पुरस्कार मिळाले. राज्य शासनाचे तीनवेळा पुरस्कार बालसाहित्य विभागाचे माझ्या तीन कवितासंग्रहांना मिळाले. मी २०१० मध्ये नायब तहसीलदार झालो, तोपर्यंत पारंपारिक साचेबंद पद्धतीने बालसाहित्य लिहित होतो. बाल साहित्यामध्ये प्रयोग करणे आवश्यक असल्याचे मत मला वाटू लागले. तोच तो प्रकार मुले वाचत नाहीत, म्हणून मी विविधांगी प्रयोग करायला सुरुवात केली. 'मन्हा मामानं गावले जावू' या पुस्तकात अहिराणी मराठी

अशा द्विभाषीक प्रयोग केला .याही पुस्तकाला राज्य शासनाचा बालकवी पुरस्कार मिळाला .'मन्हा गावले' अहिराणी बोलीतील पुस्तक प्रकाशित झाले. 'आबाची गोष्ट' हा कथासंग्रह प्रमाण भाषेतील असला तरी खानदेशी बोलीतील शब्द त्यात पेरले आहे. मुलं सहज वाचतील अशा कथा या संग्रहात आहेत. हा कथासंग्रह वाचल्यानंतर नंतर अनेक मान्यवरांच्या प्रतिक्रिया चांगल्या होत्या असे मत पुरस्काराचा आनंद व्यक्त करताना आबा महाजन यांनी ग्रंथाली जवळ व्यक्त केले श्री.आबा गोविंद महाजन हे बालसाहित्यातील सर्व वाड:मय प्रकार हाताळणारे व्यक्तिमत्त्व आहेत. अतिशय गरीबीतुन ,कष्टातून, ग्रामीण भागातून आलेल्या या मुलाने शिक्षणाच्या भरवश्यावर तहसीलदार पर्यंतची आपली मजल गाठली आहे .तहसीलदार होण्यापूर्वी ते खानदेश मध्ये शिक्षक होते. शिक्षक असल्याने विद्यार्थ्यांच्या भावविश्वाशी त्यांचा जवळचा संबंध आला. त्यातूनच साहित्य वाचन आणि लेखनाचा छंद त्यांनी जोपासला.त्यांना स्वत:ला बालसाहित्य लेखनाची नेमकी नस गवसली..त्यातच त्यांनी अनुभवलेल्या बालपणातील कडू गोड आठवणी आणि अनुभवसाठा या व्दारे ते बालसाहित्य लेखनात व्यक्त होत गेले.ग्रामीण भागातील वास्तव आणि विपरीत परिस्थितीला सातत्याने तोंड देत राहिल्याने ती परिस्थिती इतरांसाठी प्रेरक बनू शकते या अनुषंगाने त्यांनी बरेच बाल-कुमार कथा आणि काव्य लेखन केले आहे. त्यांचे साहित्य आज उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, मराठवाडा विद्यापीठ, नांदेड विद्यापीठांमध्ये आणि आठवी सुलभभारती,चौथी बालभारती या पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट झाले आहे.

साने गुरुजींच्या बालसाहित्याशी नातं सांगत सांगत त्यांनी 'गमतीच्या राज्यात, 'रिमझिम गाणी', 'लई मज्जा रे', 'बिस्कीट चा बंगला'... इत्यादी त्यांचे कवितासंग्रह आणि मौजमजा हा शिशुगीत संग्रह प्रकाशित आहे. 'चिऊ चा मोबाईल' आणि 'वाघोबाची गांधीगिरी' हे दोन बाल विनोद कवितासंग्रह प्रकाशित आहेत.चार ओळींचा द्विभाषिक बालकविता संग्रह असा आगळावेगळा प्रयोग गमतीदार खेळांचा खजिना आणि किशोर कुमारांसाठी कवितासंग्रह आपल्याला बघायला मिळतो. अहिराणी बोली भाषेतील मन्हा मामाना गावले जाऊ,मन्हा गावले इ यांचे बालकविता संग्रह प्रकाशित आहे .त्यांची 'ठोंब्या' ही बालकादंबरी बालसाहित्यात विशेष भावली आहे .त्यांचा शेखचिल्लीची फुल-टू-धमाल, बाबाची गोष्ट हे दोन कथासंग्रह प्रकाशित आहेत .त्यांच्या काही पोस्टर कविता सुद्धा प्रकाशित केल्या आहेत. त्या अनेक शाळा, महाविद्यालयांमध्ये आणि ग्रंथालयांमध्ये बघावयास मिळतात.यामध्ये शाळा, आपले घर , शिक्षक ,शेतकरी राजा, ग्रंथ महिमा इ.

त्यांनी ऑपरेशन भोंदू बाबा हे बालनाट्य त्यांनी आकाशवाणी जळगाव केंद्र यासाठी लिहिले आहे. त्यांच्या साहित्यावर अनेकांनी पुस्तक संपादित केली आहेत. त्यामध्ये मैत्री लांजेवार, डॉ.संगीता म्हसकर, कविता महाजन, संगीता माळी, डॉ किसन पाटील, जगदीश पाटील अशा अनेकांनी संपादन केली आहेत .त्यांच्या बऱ्याच कविता अहिराणी भाषेत प्रकाशित झाल्या आहेत अहिराणी भाषा ही जळगाव खानदेश मध्ये बोलली जाणारी बोलीभाषा आहे.या भाषेत प्रचंड गोडवा आहे . साने गुरुजी,बहिणाबाई चौधरीं, निसर्ग कवी ना.धो.महानोर,विंदा, पाडगावकर यांच्या जातकुळीशी नाते सांगणारी बाल कविता आबा

महाजन यांनी पुढे नेली आहे. महाराष्ट्र शासनाचे तीनवेळा राज्य पुरस्कार त्यांना मिळाले आहेत .महाराष्ट्र साहित्य परिषद ,अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य परिषद, बापूसाहेब ठाकरे बालवाङ:मय पुरस्कार, अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य पुरस्कार, पृथ्वीराज तौर उत्कृष्ट मातोश्री पुरस्कार , शशिकला आगाशे स्मृती पुरस्कार ई.ने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.खानदेश मधील एरंडोल या गावात त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले .घरी पाच एकर कोरडवाहू जमीन.वडील दुसऱ्याच्या शेतात सालदार, काबाडकष्ट करूनआयुष्य गेलं. बालपणीचा आई वारली. आत्या ,मावश्या ,काकूंनी त्यांचा सांभाळ केला.सुटीमध्ये शोधतात काम, कधी ढोरामागे जाणे, भाजीपाला विकणे,बोरं विकणे, असे करीत करीत कसाबसे शिक्षण पूर्ण केले. इतर मोठे श्रीमंत शेतकरी मालक शिकून काय तू मामलेदार होणार आहेस? ढोरं ओढ...असं जेव्हा बोलत त्यावेळेस आबा महाजन यांचे मन दुखायचे. वाचनाशिवाय पर्याय नाही .आपण वाचत अभ्यास राहिला पाहिजे.. शिकत राहिले पाहिजे या ध्येयाने प्रेरित होऊन बारावीनंतर त्यांनी शिक्षकी पेशा स्वीकारला आणि स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू ठेवली. २००९ मध्ये महाराष्ट्र एमपीएससी मार्फत ते तहसीलदार बनले. सालदाराचा मुलगा ते तहसीलदार हा प्रवास त्यांना खूप अनुभवांची शिदोरी घेऊन गेला. याच अनुभवांच्या पेरणीवर त्यांनी आबांची गोष्ट लिहिली आहे. हे पुस्तक पुण्याच्या दिलीपराज प्रकाशन संस्थेने प्रकाशित केले आहे. या पुस्तकात १७ स्वानुभवावर आधारित सत्य अशा गोष्टी त्यांनी लिहिले आहेत. आपल्याला जीवनात जे काही आपण अनुभव आपण घेतलेले आहेत , जे मनाला भावले आहेत, ते त्यांनी लिहून काढले आहेत. या पुस्तकाची पाठराखण बालसाहित्यिक डॉ. रणजित शिंदे यांनी केलेली आहे. आबाची गोष्ट या पुस्तकात शाळकरी मुलांच्या भावविश्वाचा कथा आहेत. संस्कार व बोधकथा असे त्याचे स्वरूप आहे .ग्रामीण निमशहरी अशा या कथांचा चित्रण प्रदेश आहे. प्रतिकूल अवस्थेत धडपडणारी परिस्थितीशी , दोन हात करणारे प्रमाणिक ,जिद्दी मुलांच्या या संघर्षकहाण्या आहेत. या मुलांच्या जोडीला पालकांचे एक जग त्यांच्या भल्या-बुऱ्या सह या कथांमध्ये चित्रित झाले आहेत. किशोरवयीन मुलांच्या चित्रणात प्रेरक दृष्टी आहे, सामाजिक सहिष्णुता, समता ,सत्य, सचोटी चांगुलपणा या तत्त्वांचा आविष्कार करणारी दृष्टी या गोष्टी मध्ये आहे. सामाजिक सहिष्णुता, समता, सत्य, सचोटी आणि चांगुलपणा या तत्त्वांचा विचार आविष्कार करणारी दृष्टी या सर्व गोष्टींमध्ये आहे.


साने गुरुजींच्या शिक्षकी पेशात लेखक राहिल्यामुळे सानेगुरुजींच्या शाश्वत मुल्यांची पेरणी करणाऱ्या गोष्टी आणि स्वतः बालसाहित्यात विविधांगी प्रयोग करून स्वतःची विकसित करत गेलेली बालसाहित्याची लेखन शैली, यामुळे आबा गोविंद महाजन यांचे बालसाहित्य बालकांनाच आवडते असे नव्हे तर शिक्षकांनाही, पालकांनाही ते मनापासून भावते. त्यांचा ठोंब्या हा बालनायक बालवाचकांना विशेष भावतो. आबाची गोष्ट या कथेमध्ये स्वतः आबा गोविंद महाजन यांनी त्यांच्या बालपणाच्या आठवणी सांगितल्या आहेत. चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचे पुस्तक विकत घ्यायला पैसे नसताना शेतातील बोरे विकुन त्यातून आलेल्या पैशातून आबांनी पुस्तक विकत घेतले.

दिवस–रात्र वाचून काढले,परीक्षा दिली तरी परीक्षेत यश आले नाही .मग त्यांच्या गोरे गुरुजींनी धीर आणि आधार दिला .पुढच्या परीक्षांमध्ये यश मिळव,चांगला अभ्यास कर...हा त्यांना सल्ला दिला.आबांचे पुढे अभ्यासाशी अधिक घट्ट नाते जोडून आले. शिक्षकी पेशा स्वीकारल्यावर त्यांनी स्पर्धा परीक्षेचा मार्ग निवडला आणि पहिल्याच प्रयत्नात ते तहसीलदार म्हणून नियुक्त झाले. आपण घेतलेल्या कष्टाची परतफेड झाल्याचा आनंद त्यांना झाला. ही सत्यघटनाच त्यांनी आबाची गोष्ट या साहित्य आकादमी पुरस्कार प्राप्त शीर्षक कथेमध्ये सांगितली आहे.हे पुस्तक दिलीपराज प्रकाशन पुणे यांनी प्रकाशित केले आहे. या पुस्तकाची आतील व मुखपृष्ठावरील रेखाचित्रे सरदार जाधव यांची अतिशय कल्पक रेखाटले आहेत. हा कथा संग्रह त्यांनी आपल्या आई–वडिलांना, भाऊ बहीण आणि आत्याला सर्मर्पित केला आहे.

गारपिट या गोष्टीत शेतकरी व गाय वासरू गारपिटी मध्ये मृत्यू पावतात ही हृदयद्रावक कथा वाचकांना भावविभोर करते. रिक्षावाल्याचा प्रामाणिकपणा, मराठी सहावा मॅट्रिक, मला शिकायचं, बोलका वर्ग, कष्टाळू चोर, गुरढोरं आणि पुस्तक, दोस्ती राम रहीम ची ई. सर्वच कथांमधून आबा महाजन बाल वाचकांमध्ये बंधूभावाची पेरणी करीत असतात . बाल वाचकांची नेमकी नस आणि बालसाहित्य लेखनाची भाषाशैली त्यांना गवसल्यामुळे त्यांचे बालसाहित्य बालकांच्या आणि पालकांच्या पसंतीस उतरले आहे . श्री.आबा गोविंद महाजन नावाच्या या कष्टकरी व्यक्तिमत्त्वाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व त्यांच्यातील बालसाहित्य लेखनातील प्रयोगशीलता अशीच विकसित होत जावो यासाठी त्यांना मनापासून सदिच्छा...

–९४२२१८०४५१





# कष्टमय बालविश्वाची कथा आबाची गोष्ट

प्राचार्य डॉ. किसन पाटील

मराठीतील बाल साहित्याच्या परिवेशात सातत्यानं सर्जनशील तसेच प्रयोगशील लेखन करणारे साहित्यिक म्हणून आबा गोविंदा महाजन यांचा परिचय सर्वांना आहे. प्राथमिक शिक्षक ते नायब तहसीलदार असा त्यांचा प्रवास एका धडपडणाऱ्या सामाजिक भान असलेल्या शिक्षकांचा आणि शासकीय प्रशासकाचा पिंड वर्णन करणारा ठरतो.

बालकविता आणि बालकथा लेखनातील त्यांची सर्जनशीलवृत्ती सर्वश्रूत असून गमतीच्या राज्यात, रिमझीम गाणी, बिस्कीटचा बंगला, शिशुगीत संग्रह, चिऊचा मोबाईल, वाघोबाची गांधीगिरी, गमतीदार खेळांचा खजिना, हिप हिप हुर्रे पोस्टर कविता आणि ठोंब्या कादंबरी इत्यादी बालसाहित्य प्रकाशनाची त्यांची वाटचाल स्पृहणीय ठरते. आता त्यांचा कथासंग्रह 'आबाची गोष्ट' हा बालकांच्या रंजनासह ज्ञानात्मक प्रबोधनासाठी आलेला आहे. विविध नियतकालिके, दिवाळी अंक अशा माध्यमातून या स्फुट व प्रासंगिक कथा प्रकाशित झाल्यात. त्यांचा हा संग्रह म्हणजे 'आबाची गोष्ट' म्हणावा लागेल.

'आबा' हे एक ग्रामीण शेतकरी-कष्टकरी कुंटुंबात वाढलेलं व्यक्तिमत्व आहे. शिक्षण घेता घेता आलेल्या बालवयातील अनुभवांची, धडपडणाऱ्या क्षणांची, संस्कारलेल्या अनुभवांची आणि परिस्थितीशी संघर्ष करीत उच्चपदापर्यंत पोहचलेल्या जडणघडणीचा खडतर प्रवास आहे. या प्रवासातील उत्कंठाबर्धक, अंत:करणात हालचाल निर्माण करणाऱ्या घटनांची ही मांडणी आहे. या कथासंग्रहात एकूण १७ कथांची मेजवानी आहे. गारपीट, टोपण नाव, नयनदान, कष्टाळू चोर, मला शिकायचंय, मॅट्रीक अशा काही कथांचे नायक, कष्टकरी-मेहनती असून त्यांची अनौपचारिक संस्कारशील शिक्षणातून जडण-घडण होत आहे. हे अनुभवांचे, श्रमांचे शिक्षण, बालपणात कष्ट करण्याचे धाडस या कथा सांगतात.

गफुरभाई, रिक्षावाला, दिनूची कमाल, दोस्ती राम-रहिमची, आबाची गोष्ट या कथातून बालवयातच आलेल्या भावनिक साक्षरतेच्या खुणा ही कथा जपते. केवळ पुस्तकी शिक्षणापेक्षाही समाजात-कुटुंबात आणि शाळाबाह्य पर्यावरणात धडपडणारी मुलं कशी घडत जातात, त्याची ही कथा वास्तवपूर्ण अनुभूतीची कथा ठरते. मानवता, सर्वधर्म समभाव, मैत्री आणि सहिष्णुता, समानता, आणि निखळ प्रेमळभाव यांचा संदेश देणारी ही कथा आहे. प्रत्येक कथा एकापेक्षा अनेक संस्कार, अनौपचारिक शिक्षणाचे वस्तुपाठ मांडत जाते. आत्मज्ञानी होता होता स्वत:च्या आतमध्ये दडलेल्या कला-कौशल्यांचा, आत्मबोध आणि शोध घेण्यासाठी बालकुमारांना प्रेरित करणारी ही कथा

आहे. लेखक प्रमाणभाषेतून निवेदन करीत बालकांना त्यांच्या बोलीतून संवादरूपाने प्रकट करतो. त्यामुळे ही कथा वाचकांना आपली वाटते.

या कथेची काही सर्वसाधारण वैशिष्टये अशी सांगता येतील

१)आबाची गोष्ट ही बाल-किशोर-कुमार वयातील जीवननिष्ठ जाणिवांनी फुललेली कथा आहे.

२)धडपडणे, अनुभव कथन करणे, कला-क्रीडा कौशल्यांचा विकास घडवित आपला नवा शोध बोध घेण्यासाठी नव्या पिढीला ती प्रवृत्त करते.

३)शाळेत शिकणारी मुलं आणि त्यांचे औपचारिक शिक्षणासह शाळाबाह्य अनुभूतीचे अनौपचारिक शिक्षण यांचा सुंदर ताना-बाना आबा महाजनांनी गुंफलेला आहे.

४) कथनप्रियता, संवादशीलता आणि गेयपूर्ण निवेदनातून अभिव्यक्त होणारी सर्जकता या कथेत जाणवते.

५)प्रत्येक कथा बोधात्मकता, रंजकता, संघर्षशीलता, प्रामाणिकता आणि जिद्दीने पुढे जाण्याची आत्मविकासभिमुखता यापैकी काही ना काही संस्काराचे वहन करत आहे.

६) आई-वडील, नाती-गोती, शालेय वातावरण, मित्र-मैत्रिणी, शिक्षक यांच्याशी संवाद साधून आपली जडणघडण करणारी ही कृतीशील विद्यार्थ्यांची शिक्षण घेण्याची प्रवृत्ती अधोरेखित आहेत.

७)प्रमाण आणि बोलीभाषेचा सहज वापर, साधी-सोपी आकलनक्षम सुलभ अशी भाषाशैली हे आबा महाजन यांच्या लेखनशैलीचे विशेष यामध्ये आहेत.

८)बाल-कुमार भावविश्वात रमणारी, कष्टातून शिक्षण घेण्यास प्रवृत्त करणारी, खान्देशचा निसर्ग-पर्यावरण आणि बोलीभाषेचा परिघ जपणारी, मूल्यशिक्षणासह संस्कारांची पेरणी करणारी ही 'आबाची गोष्ट' हेच तिचे स्व:चे वेगेळपण वैशिष्ट्य आहे.

आबा महाजनांची कविता जशी अल्पाक्षरात खूप काही पण मोजके सांगून जाते, तशी ही कथा त्या काव्याचा विस्तार होऊन अधिक रंजक- मनोबेधक आणि वाचनसंस्कृतीचा वस्तुपाठ निर्माण करते. तिला जसा प्रादेशिक गोतावळा आहे, तसाच वैश्विक बालमनाच्या उत्स्फूर्त जडणघडणीचा संदर्भही आहे. त्यासाठीच 'आबाची गोष्ट' या कथासंग्रहाचे बालसाहित्य विश्वात स्वागत करतो.


## सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ४०० रूपये द्विवार्षिक वर्गणी - ७०० रूपये त्रैवार्षिक वर्गणी-१००० रूपये

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No--13320200000322 Ifsc-BARB0SHIRPU

....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....

With pay any app

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री क्रांतीनगर मुपोता-शिरपुर जि-धुळे ४२५४०५

(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

# संस्कार सिंचनाच्या प्रेरणेतून आविष्कृत झालेला प्रयोगशील बालकथा संग्रह 'आबाची गोष्ट'

प्रा.डॉ.फुला बागुल


दिलीपराज प्रकाशन पुणे यांनी सप्टेंबर १९१७ मध्ये प्रकाशित केलेल्या या बालकथा संग्रहास नुकताच साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला. संस्कार सिंचनाच्या भूमिकेतून लिहिलेल्या या कथांतून श्री.आबा महाजन काही प्रयोग करताना दिसतात. यातील कथांतून श्री.आबा महाजन बाल-किशोर वाचकांसमोर काही एक आदर्श ठेवतात .ते करताना श्री.महाजन आपले बालपण, आपला भवताल प्रासादिक भाषेतून साकारतात. जीवनात अनुभवलेला अभाव, भेटलेली सत्प्रवृत्त माणसे, कृषी संस्कृतीचे पैलू ,मानवी नातेसंबंधात झालेली परिवर्तने, शिक्षणासाठी घेतलेले कष्ट या नव्या आशयाच्या या सार्‍या कथासूत्रातून ओवलेला बालविश्वाचा धागा या संग्रहाची सेंद्रिय बांधणी निर्देशित करतो .सामान्यपणे बाल साहित्यातून अद्भुत रम्यतेचे विश्व प्रतिबिंबित होते परंतु या संग्रहातून त्याऐवजी वास्तव असे ग्राम , कृषी वास्तव प्रतिबिंबित होते हीच या बालकथा संग्रहातली दृश्य अशी प्रयोगशीलता आहे . बाल वाचकांच्या अनुभवविश्वाशी कमाल पातळीवरचे तादात्म्य साकारण्यासाठी येथे अनेक बाबी येतात . यात शालेय जीवनातले घटना प्रसंग प्रमुख आहेत.


साधारणपणे निमशहरी ग्रामीण अशा संमिश्र स्तरातील मुले ऐंशी-नव्वदच्या दशकात जे जीवन जगत होते ते तत्कालीन संदर्भासह या संग्रहात येते.म्हणजेच हा संग्रह बाल साहित्यातल्या अद्भुतरम्यतेला फाटा देणारा संग्रह आहे.या संग्रहात पारंपरिक जीवन मूल्यांसह आधुनिक अशीही मूल्ये येतात.भूतदया, प्रामाणिकपणा ,धर्मनिरपेक्षता, गुरुजनांप्रति कृतज्ञता ,कष्टांती फलप्राप्ती या मूल्यांसह अवयवदान, ज्ञान साधनेतील सातत्य, लिंगभेदास नकार, ज्येष्ठांचा सन्मान, स्त्रीशिक्षण उत्तेजन, ज्ञानदानातील समर्पण, कर्तव्यतत्परता व त्यातून लाभणारे समाधान ,अधिवास भावाची जपणूक, योग्य मार्गदर्शनाची निर्णायकता, छंदा सक्ती ही नवी संस्कार तत्त्वे, प्रबोधन मूल्ये येथल्या कथांतून रुजवली जातात .स्वतः लेखक श्री आबा महाजन यांनी संघर्ष करीत आपला आजवरचा जीवन प्रवास केला आहे .कष्ट ,जिद्द आणि चिकाटी याशिवाय असामान्य असे काही प्राप्त करता येत नाही ही स्वतःची कहाणी त्यांनी या संग्रहातल्या कथांतून चितारली आहे .बाल वाचकांसमोर आदर्श ठेवण्यासाठी इतिहासातील किंवा पुराणातील नायक चितारण्यापेक्षा आपल्याच मातीतला कष्टातून पुढे आलेला नायक या संग्रहात येतो. बाल -किशोर वाचकांनी या कहाण्यातून बोध

घेऊन स्वतःला घडवावे या प्रेरणेतून या बाल कथासंग्रहाची निर्मिती झाली आहे .मानवेतर प्राण्यांबद्दलची आस्था या कथांतून वृद्धिंगत केली जाते .बाल किशोर वाचकांना या कथा पुनर्प्रत्ययाचा आनंद देतात .बाल-किशोर वाचकांच्या अनुभव विश्वाच्या कक्षा किती रुंदावल्या आहेत हेदेखील हा संग्रह अधोरेखित करतो .ऐंशी-नव्वदच्या दशकातील भूतकाळ जिवंत करण्याची अनुपम शैली श्री महाजन यांच्याकडे आहे . नव्या शिक्षण क्रांतीचा महत्त्वाचा घटक ठरलेल्या ज्ञानरचनावादाच्या प्रभावी अंमल बजावणीसाठी श्री महाजन यांच्यातला हाडाचा शिक्षक काही शैक्षणिक प्रयोग राबवून शालेय उपस्थिती वाढवतो . बनगरवाडीतल्या मास्तरा प्रमाणे आत्यंतिक समर्पणातून शाळेचा लौकिक वाढवतो . आणि महिला शिक्षणास उत्तेजन देतो .

आपल्या आत्मगत अशा लोकल छंदातून ग्लोबल असे समाजहित साध्य व्हावे,शिक्षण व महसूल क्षेत्रातील बरबटलेले प्रशासकीय वास्तव हे आशय वैविध्य मराठी बाल कथेत अपूर्व आहे . खानदेश संस्कृतीचे प्रतिबिंब आणि खानदेशच्या प्रमुख बोलीतील म्हणजे अहिराणीतील संवादांचे उपयोजन ही प्रयोगशीलता अत्यंत लक्षणीय आहे . बोलींच्या पुर्नप्रतिष्ठेसाठी ती आवश्यकही आहे . छोटी छोटी लयदार वाक्ये, साजेशी अलंकृतता, संवादी शैलीचे प्राबल्य, बालसुलभ खट्याळपणाची काही स्थळे, वेगवान कथानक, प्रथम व तृतीय पुरुषी निवेदन पद्धतींचा प्रसंगानुरूप वापर, ललितरम्यतेची झलक, बालसुलभ विनोद, ध्वन्यर्थक शब्दांची योजना, बालकांच्या वृत्ती प्रवृत्तींचे दर्शन यांसारख्या वैशिष्ट्यांनी हा बालकथा संग्रह सजलेला आहे . यातली उपरोक्त प्रयोगशीलता स्तुत्य आहे. आबाची गोष्ट मुळे मराठी बाल कथा काही पाऊले पुढे गेली आहे . . . .

-९४२०६०५२०८





# 'साहित्य अकादमीने गौरविलेली : आबाची गोष्ट'

डॉ.अशोक कोळी

'करि मनोरंजन जो मुलांचे, जडेल नाते प्रभूशी तयाचे...' पूज्य साने गुरूजी यांचे हे वचन आहे. आपल्या ह्या वचनाचा प्रत्यय आणून देणाऱ्या अनेक गोष्टी साने गुरूजींनी लिहिल्या व मुलांचे प्रबोधन, मनोरंजन केले. गुरूजींच्या अनेक गोष्टी, कविता विद्यार्थ्यांना तोंडपाठ आहेत. कित्येक विद्यार्थी आणि शिक्षक या दोहोंवरही साने गुरूजींच्या वाङ्:मयाने कायमचे गारूड केलेले आहे. याला नव्या पिढीतील लेखक आणि शिक्षकही अपवाद नाहीत. यातीलच एक नाव आहे आबा गोविंदा महाजन.

आबा गोविंदा महाजन हे खानदेशातील प्रथितयश प्रयोगशील बालसाहित्यिक व शिक्षक (आत्ताचे तहसीलदार, शिरपूर, जि.धुळे) यांना २०२० या वर्षासाठीचा अत्यंत मानाचा साहित्य अकादमीचा बालसाहित्यातील पुरस्कार गेल्या आठवड्यात जाहीर झाला आहे. त्यांच्या 'आबाची गोष्ट' या लघुकथासंग्रहासाठी हा पुरस्कार आहे. तो जाहीर होताच वाङ्:मयक्षेत्रातून त्याचे प्रचंड स्वागत झाले.

आबांचे अभिनंदन करणाऱ्यांमध्ये मी सुद्धा होतो. आबा भरभरून बोलत होता. विनयतेने अभिनंदन स्वीकारत होता. फोनवरील बोलणे संपल्यानंतर आबाच्या एकूणच वाङ्:मयीन कारकिर्दीचा आलेख माझ्या डोळ्यांसमोरून तरळू लागला... कोण आहेत आबा महाजन; त्यांचा साहित्यिक प्रवास कसा-व कोठून सुरू झाला. याचा धांडोळा मनात सुरू झाला. तसातर आबा माझा डी.एड.चा वर्गमित्र... आम्ही त्या वेळी चोपडा (जि.जळगाव) येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून डी.एड.करत होतो.

आबा मुळातच विलक्षण बुद्धीचा, संवेदनशील मनाचा व सालस स्वभावाचा मुलगा होता. आमच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य रा.मो.साळवी यांची अध्यापक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी धडपड नेहमी सुरू असायची. त्यातीलच हस्तलिखित भित्तिपत्रक ही कल्पना होती. या हस्तलिखित भित्तिपत्रकावर त्या वेळचे आमचे वर्गमित्र राजेंद्र उगले, रवींद्र साळी आदींच्या कविता झळकायच्या. त्यांचे कौतुक व अभिनंदन व्हायचे.

आबा आणि माझ्या मनात येथेच साहित्याचे पहिले बीज अंकुरले. शिक्षणशास्त्र विद्यालयातील याच प्रांगणात आमच्या मनावर साहित्याचा पहिला संस्कार झाला. मात्र तेव्हाचा प्रवास बराचसा बाळबोध होता. काय वाचायचं, कुठलं वाचायचं-या बाबतीत निश्चित अशी दिशा नव्हती; पण डी.एड.नंतर दोघांच्याही लिखाणाचा वेग वाढला आणि आम्ही आपापल्या

साहित्यिक वाटाही निवडल्या. मी ग्रामीण साहित्याकडे वळलो, तर आबा बालसाहित्याकडे...

आबाने निवडलेली वाट अचूक होती, हे आता सिद्ध झाले आहे. कसा राहिला आबाचा साहित्य अकादमीपर्यंतचा प्रवास? तर, ही वाट निश्चितच सोपी नव्हती. आबाला कुठलाही शैक्षणिक, साहित्यिक वारसा नव्हता. घरची सगळी परिस्थिती अशा गोष्टींसाठी बिलकुलच अनुकूल नव्हती. जळगाव जिल्ह्यातील एरंडोलसारख्या आडवळणाच्या गावी एका शेतमजूर कुटुंबात त्याचा जन्म झाला. घरची परिस्थिती दारिद्र्याने भारलेली होती. सोबतच वृद्ध आई-वडील व भावंडांची जबाबदारी अंगावर येऊन पडलेली होती. आई लहानपणीच जग सोडून गेलेली. अशा परिस्थितीमुळेच आबाने शिक्षकी पेशा निवडलेला होता. त्या वेळी डी.एड. झाले की नोकरी लागायची. झालेही तसेच होते.

डी.एड.१९९४ मध्ये संपले आणि आबाला शिक्षकाची नोकरी मिळाली. जळगाव जिल्हा परिषदेमध्ये तो शिक्षक म्हणून रूजू झाला. शिक्षकाची नोकरी म्हटल्यावर आबाचे मुला-फुलांशी नाते कायम राहिले. चोपडा येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून झालेली साहित्यसंस्कारांची पेरणी शिक्षक म्हणून कार्य करताना फळाला आली. ग्रामीण भागातीलच विद्यार्थ्यांच्या मनोविश्वात रमायला लागला. सोबतच भा.रा.भागवत, न.म.जोशी, मंगेश पाडगांवकर, कल्याण इनामदार, शांता शेळके, विंदा करंदीकर, वि.वा. शिरवाडकर, वीणा गवाणकर आदी मान्यवरांच्या लेखनाच्या वाचनाचा सपाटा त्याने लावला.

अनेक नामवंत साहित्यिकांशी आबा पत्ररूपाने संवाद साधायचा. त्यांच्या आवडलेल्या साहित्याविषयी बोलायचा. स्वत:करत असलेल्या तोडक्या-मोडक्या काव्याविषयीही सांगायचा. अशा या पत्रसंवादातून, प्रत्यक्ष भेटीतून आबाचा मन:पिंड घडत गेला. सोबतच स्वत:ची वेगळी वाट धुंडाळता आली. वाचनाने त्याच्या मनावर साहित्यिक संस्कार तर झालेत, शिवाय आपण कुठल्या दिशेने जायला हवे, हेही कळले. त्यातूनच वाङ्:मयीन व्यक्तिमत्वाची जडण-घडण सुरू आली. शब्दफुलांची ओंजळ भरून आबा साहित्यपंढरीच्या प्रवासाला निघाला.

सुरूवातीच्याच काळात आबाच्या कविता किशोर, गंमत जम्मत, टॉनिक, मुलांचे मासिक, निर्मळ रानवारा यांसारख्या प्रतिष्ठित नियतकालिकांतून, दिवाळी अंकांतून झळकू लागल्या. त्याच्या या लेखनप्रसिद्धीने व अनोख्या वाङ्:मयीन शैलीने साहित्याविश्वाचे लक्ष वेधले. कोण हे नवे बालसाहित्यिक म्हणून वाचक चौकशी करू लागले. यानिमित्ताने अनेक जाणकारांच्या भुवया उंचावल्या गेल्या. एव्हाना आबाने आपला लेखन वारू उधळून दिलेला होता.

डी.एड. संपल्यापासून ते नोकरीची सुरूवातीची काही वर्षे...पाचेक वर्षांचा कालखंड लोटलेला होता. एवढ्या कमी कालावधीत आबाने साहित्यक्षेत्रात बालसाहित्यिक म्हणून दबदबा निर्माण केला होता. आपल्या प्रकाशित झालेल्या बालकविता त्याने महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडे पाठवून दिलेल्या होत्या. त्याच्या ह्या पहिल्या संग्रहास साहित्य संस्कृती मंडळाकडून अनुदान मंजूर झाले. आबाचा आनंद द्विगुणित झाला. आणखी दुग्धशर्करा योग म्हणजे पुण्याच्या ग.म.भ.न या मान्यवर प्रकाशन संस्थेकडून तो संग्रह प्रकाशित झाला.

आबाचा बालकवितासंग्रह थाटात दाखल झाला होता. 'गमतीच्या राज्यात' असे त्याचे नाव होते आणि प्रकाशनवर्ष होते २००१... आबाचा हा पहिलाच संग्रह असला तरी पहिलेपणाच्या खुणा त्यात अजिबात

नव्हत्या. सकस, दर्जेदार, नावीन्यपूर्ण, आशयघन शब्दकळा घेऊन आबा बालसाहित्यिक म्हणून दाखल झाला होता. प्रकाशक ल.म.कडू यांनी केवळ अनुदानावर अवलंबून न राहता सुंदर, सुबक, देखणी निर्मिती केली होती. आशयघन शब्दकळा आणि सुबक छपाई यांचा संगम झाल्याने हा संग्रह देखणा झाला.

पहिल्याच कलाकृतीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. सोबतच खूप चर्चा झाली होती. आतापर्यंतची बालकविता पानाफुलांत रममाण होण्यात धन्यता मानत होती; मात्र आबाची शब्दकळा स्वत:ची स्वतंत्र नाममुद्रा घेऊन आली होती. ती प्रत्यक्ष मुलांना गमतीच्या अनोख्या राज्यात (विश्वात) घेऊन जाण्यात यशस्वी ठरली होती. आबा महाजन यांचा काव्यप्रवास सुरू झाला. त्यानंतर त्यांनी मागे वळून कधी पाहिलेच नाही. एकामागून एक कवितासंग्रह, कथासंग्रह, बालनाट्य, बालकादंबऱ्या त्यांनी लिहिल्या.

तो काळ भारावलेला आणि मंतरलेला होता. निकोप स्पर्धा होती. शिवाय लिहित्या हातांना हमखास बळ दिलं जायचं. त्या कौतुकाचा आणि स्वागतशील मार्गदर्शनाचा धनी आबा ठरला होता. नव्यानेच लिहू लागलेल्या या लेखकाचे स्वागत जसे महाराष्ट्रभर होत होते. तशीच त्यांची वाङ्:मयीन दखल गावाकडेही घेतली जात होती. त्या वेळी आबाच्या गावी एरंडोल येथूनच औदुंबर साहित्य चळवळ राबविली जात होती. या चळवळीचे पाठीराखे श्रीपाल सबनीस होते. तर वा.ना.आंधळे, म.ना.आंधळे, विलास कांतिलाल मोरे, प्राचार्य यशवंत पाटील आदी मंडळींचा सहभाग होता.

औदंबुर साहित्य मंचच्या माध्यमातून एरंडोल येथे विविध कार्यक्रम व्हायचे व उपक्रम राबविले जायचे. या उपक्रमांचा, वाङ्:मयीन कार्यक्रमांचा, व्यासपीठांचा मोलाचा वाटा आबा गोविंदा महाजन हा साहित्यिक घडविण्यात राहिला. आबाच्या पहिल्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ एरंडोल येथील याच मंचावर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला होता. त्याचबरोबर जळगाव येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेची शाखाही तेव्हा भरपूर कार्यक्रम घ्यायची. प्रा.नारायण शिरसाळे हे मपासचे जिल्हा प्रतिनिधी व शाखा अध्यक्ष होते.

नारायण शिरसाळे यांचा स्वभाव मृदू व सहकार्यशील होता. नवोदितांना त्यांचे मार्गदर्शन असायचे. त्यांचे स्वत:चे वीणा प्रकाशन होते. आबाच्या लेखनातील हरहुन्नरी पाहून शिरसाळे यांनी त्यांना प्रोत्साहन देत त्यांची 'मौजमजा' व 'रिमझिम गाणी' ही पुढील पुस्तके प्रकाशित केली. नारायण शिरसाळे हे जाणकार प्रकाशक होते. शिवाय घों.वे.जोगीगुरूजी हेही नावाजलेले बालसाहित्यिक जळगाव येथे होते. त्यांचेही मार्गदर्शन आबाला लाभले.

अशा प्रकारे आबा महाजन यांची साहित्यिक जडणघडण होत राहिली. अनेक व्यासपीठांवरून त्यांना काव्यवाचनाची संधी मिळाली. विशेषत:मसाप जळगाव आणि आकाशवाणी जळगाव यांनी त्यांच्या सादरीकरणाला पुरेपूर वाव दिला. जळगाव आकाशवाणी केंद्राचे संचालक सुप्रसिद्ध कवी बालसाहित्यिक उत्तम कोळगावकर, कार्यक्रम अधिकारी प्रतिमा जगताप यांच्या माध्यमातून अनेक कार्यक्रम आबांनी सादर केले. 'ऑपरेशन भोंदूबाब' हे बालनाट्य आकाशवाणीवरून प्रसारित झाले व खूप गाजले.

दरम्यान, आबाने स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू ठेवलेली होती. त्या माध्यमातून त्यांची नायब तहसीलदार म्हणून निवड झाली. त्यानंतर त्यांनी

शिक्षकी पेशाला रामराम ठोकला व प्रशासकीय सेवेत रूजू झाले. असे असले तरी आबाच्या व्यक्तिमत्त्वातून साने गुरूजींचा शिक्षक कधी वजा झाला नाही किंवा त्यांच्यातील बालसाहित्यिक लोप पावला नाही. नोकरीत झालेला बदल असेल किंवा प्रशासकीय सेवेतील ताणतणाव, आबांनी आपल्या वाङ्:मयसेवेवर कधीही परिणाम होऊ दिला नाही. उलट, अधिक जोमाने ते कामाला लागले व पुढील काळात त्यांची पुढील पुस्तके प्रकाशित झाली.

बिस्किटचा बंगला, लई मज्जा रे, चिऊचा मोबाईल, वाघोबाची गांधीगिरी, गमतीदार खेळांचा खजिना, हिप हिप हुर्रे. यात बहुतेक कवितासंग्रह होते. बालकाव्य, कुमार काव्य, शिशुगीत, विनोदी बालकविता... पूर्वसुरींची वाट पुसत-पुसतच आबा महाजन यांचा बालसाहित्यिक म्हणून प्रवास सुरू होता. दरम्यान, बालसाहित्यातील त्यांच्या मुशाफिरीला दशकभराचा दशकभराचा कालखंड लोटला होता. सुरूवातीचे नवखेपण संपले होते. पोक्तपणाकडे, साहित्यिक भूमिकेकडे आबाचे लक्ष गेले. अनेक परिसंवाद, व्यासपीठांवरील वावर व प्रदीर्घ अनुभव-चिंतनातूनही प्रगल्भता आली होती.

मग आबा महाजन यांची दुसरी इनिंग सुरू झाली होती. स्वतंत्र वाङ्:मयीन प्रवाह निर्माण करण्याकडे त्यांची पावलं पडू लागली. आधीचा काहीसा रंजनात्मक बाळबोध विचार सोडून त्यांचे साहित्य प्रगल्भतेकडे झेपावू लागले होते. फास्टर फेणेसारखा हा नायक त्यांनी रूजविला. 'ठोंब्या' नावाची कादंबरी, 'टांगाटोली' नावाचा कथासंग्रह, यावर कडी म्हणून की काय त्यांनी 'मन्हा मामाना गावले जाऊ' हा खानदेशी अहिराणी बोलीतील स्वतंत्र कवितासंग्रह निर्माण केला. 'मन्हा गावले' व 'खानदेशी गाव' या अत्यंत दर्जेदार नावीन्यपूर्ण पुस्तकांची निर्मिती केली. हीच काय ती आबा महाजन यांची सर्वोत्तम कमाई.

या अगोदर साने गुरूजी, बहिणाबाई चौधरी, बालकवी यांच्या साहित्यातून खानदेश डोकावत होता. पण संपूर्ण खानदेशी बोली, खानदेशी संस्कृती बालसाहित्यात आणण्याचे काम आबा महाजन यांनी हिरीरीने केले. बालसाहित्यातील बोलीचा हा वावर नावीन्यपूर्ण ठरला. यात अधिकची भर पडली ती २०१७ मध्ये प्रकाशित झालेल्या 'आबाची गोष्ट' या कथासंग्रहाची. हा संग्रह तर अत्युच्च वाङ्:मयीन मूल्यात्मकतेचा व प्रयोगशीलतेचा परमोच्च बिंदू ठरला. या संग्रहातील सर्वच कथा जिवंतानुभव देतात व स्वतंत्र रसरशीत कथन निर्माण करतात.

आबांच्या कथा, कविता अनेक मानसन्मान पुरस्कारांच्या धनी ठरल्या. विविध अभ्यासक्रमांत त्या सन्मानने विराजमान झाल्या. महाराष्ट्र शासनाच्या पुरस्कारासह प्रतिष्ठेचे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले. पण परवा जाहिर झालेल्या साहित्य अकादमीच्या बालसाहित्य पुरस्काराने खऱ्या अर्थाने त्यांच्या प्रयोगशील बालसाहित्य परंपरेचा गौरव झाला. खरं तर हा त्यांना मोठं करणाऱ्या साहित्यपरंपरेचा व खानदेशी संस्कृतीचा गौरव आहे.

एका शेतमजूर कुटुंबातील सालदाराच्या मुलाच्या नावाचा डंका यानिमित्ताने भारतवर्षात गाजला. त्यांची ही वाटचाल इथेच न थांबता जागतिक स्तरावर जावो, या मन:पूर्वक शुभेच्छा देतो आणि आबा गोविंदा महाजन यांचे पुन:श्च अभिनंदन करतो!

-९४२१५६८४२७

# मुलांना गोष्टी सांगणाऱ्या आबांची गोष्ट

**जयवंत चव्हाण**


जळगाव जिल्ह्यातील एरंडोल गावात शेतमजूर कुटुंबात आबाचा जन्म झाला. मजुराच्या घरात वाचन-लेखन करणार कोण?... पण, आबाच्या अंगची ऊर्मी स्वस्थ बसू देईना. शेजारीच भारंबे शिक्षक दाम्पत्य राहायचे. त्यांनी आबाला वाचनाची गोडी लावली. साने गुरूजी, बहिणाबाई, बालकवींची अनेक पुस्तके आबाने शालेय वयात वाचून पूर्ण केली. शालेय पुस्तकांशिवाय इतरही साहित्य असते याची जाणीव आबाला तेव्हाच झाली. पुस्तके वाचण्याचा दिनक्रम मग अविरत सुरूच राहिला. आबा पुस्तके तर नेतो, पण वाचतो का? अशी शंका भारंबे गुरूजींना आली. गुरूजींनी ते शोधून काढण्याचा नामी उपाय शोधून काढला. त्यांनी आबाला पुस्तकावरील प्रश्न विचारण्यास सुरूवात केली. विशेष म्हणजे, आबाकडे सर्वांचीच उत्तरे होती. आबा खरोखरच पुस्तके वाचत असल्याची खात्री मग गुरूजींनाही पटत असे. आबाचे वाचनाचे वेड लक्षात घेऊन मग गुरूजींनी त्याला काही वेगळे विषय वाचायला दिले. झाडाझडती, ययाती, बिढार, पानिपत... असा वाचन यज्ञ मग सुरूच राहिला. माडगुळकर, ना.धों. महानोर, राजन गवस अशा अनेक मान्यवरांची पुस्तके आबाने झपाट्याने वाचून काढली. तेव्हा आपणही लिहावे, असे आबाला वाटू लागले. तसे प्रयत्नही त्याने सुरू केले. कविता, कथा, प्रेमकविता अन् वात्रटिका असे लेखन सुरू केले. नंतरच्या काळात दहावी, डिप्लोमा करून आबाला नोकरीही मिळाली. दुर्गम भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेत आबा शिक्षक झाला. एक शिक्षकी शाळेत रोज मुलांना काहीतरी कथा, गोष्टी सांगाव्या लागत. पुस्तकातल्या गोष्टी संपल्यावर आता नवीन काय? सांगणार, असा प्रश्न आबाला पडला. म्हणून मग मुलांना रूचतील, आवडतील अशा गोष्टी लिहायला सुरूवात केली. मुलांनाही त्या आवडू लागल्या. अनेक बाल साहित्यकारांशी संपर्क साधून लेखनात सुधारणा केल्या. मुलांच्या भावविश्वात शिरून त्यांच्यासाठीच लिहिले पाहिजे यावर आबाचे मत दृढ होत गेले. काहींनी सांगितले की बालवाड:मयाला फार कोणी गांभीर्याने घेत नाही, त्यात फार काही करून उपयोग नाही, इतर विषयावंर लिहा...

पण मुलांचे विश्व समृद्ध करण्यात, पिढी घडवण्यात आनंद जास्त आहे... मोबाईल गेम, यू-ट्युबच्या काळात पुस्तकेच आयुष्याला कलाटणी देऊ शकतात, हे स्वानुभवावरून शिकलेल्या आबाने तोच ज्ञानयज्ञ सुरू ठेवला. २००६मध्ये राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा आबाने दिली आणि त्यात उत्तीर्ण होऊन तो तहसीलदर पदावर रूजही झाला. आता

सरकारी नोकरी... ती म्हटली की अनेकदा रटाळ, अरसिक अशी वर्णने ऐकली होती. पण त्यातही संवेदनशीलता किती महत्त्वाची असते, लोकांचे प्रश्न सोडवण्याचा आनंद किती असतो हे आबा स्वानुभवातून शिकला. अनेक लोक आजही भेटतात आणि झालेल्या कामाची पोचपावती त्याला देतात. २००१ मध्ये 'गमतीच्या राज्यात' पुस्तक प्रसिद्ध झाले. त्याला अनेक पुरस्कार मिळाले. २००८मध्ये आबाच्या 'लई मज्जा रे' ला राज्य सरकारचा भा.रा.तांबे पुरस्कार मिळाला. 'बिस्किटचा बंगला' पुस्तक करण्याचा सल्ला मंगेश पाडगावकरांनी दिला होता. या पुस्तकालाही शासनाचा वा.गो. मायदेव पुरस्कार मिळाला. आबांची आतापर्यंत १३ पुस्तके व १० पोस्टर कविता, दोन बालकुमार कथासंग्रह, दोन बालकुमार कांदबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. 'मन्हा मामाना गावले जाऊ' हा पहिला अहिराणी बालकविता संग्रह त्यांनी लिहिला. अहिराणी व मराठी असा द्वैभाषिक प्रयोग त्यांनी केला. त्यांच्या अनेक कथा-कविता इतर भाषांत अनुवादित झाल्या. त्यापैकी काहींचा पाठ्यपुस्तकांत, विद्यापीठ अभ्यासक्रमांत समावेश झाला आहे. या सगळ्यावर साहित्य अकादमीची मोहोर उमटली.

- ७५०६७१२२०३





# आबा महाजन यांच्या बालसाहित्याला साहित्य अकादमीचे तोरण

प्रा.बी.एन.चौधरी

आबा गोविंदा महाजन म्हणजे खानदेशातील बालसाहित्यातील एक दमदार नांव. प्राथमिक शिक्षक ते तहसीलदार (प्रशासकीय अधिकारी) हा संघर्षशील प्रवास व्हाया बालसाहित्य असा करतांना आज त्या वाटेवर अभूतपूर्व असं यश हाती लागलं आहे. त्यांच्या आबाची गोष्ट या बाल-कुमार कथा संग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. बाल-कुमारांवर सामाजिक सहिष्णूता, समता, सत्य, सचोटी आणि चांगुलपणाचा संस्कार करणाऱ्या आबांच्या बालसाहित्यावर ही गुणवत्तेची मोहर उमटली आहे. खानदेशातील बालसाहित्यात हा सन्मान प्रथमच लाभला आहे. या निमित्ताने हा खानदेशचाच गौरव झाला आहे. आबाच्या बालसाहित्याला साहित्य अकादमीने गुढीपाडव्यापूर्वी तोरण लावले आहे. आबाची गोष्ट या कथा संग्रहात ग्रामीण भागतील शिक्षणासाठी धडपडणाऱ्या आणि अधिकारी होण्याचं स्वप्न पाहणाऱ्या एका बालकुमाराच्या कथा आहेत. त्या प्रत्यक्ष आबाच्याच जीवनातील घटनांचं वर्णन आहेत. परीस्थितीशी दोन हात करतांना, प्रतिकूल परिस्थितीत केलेला संघर्ष आहे. एका प्रामाणिक, जिद्दी आणि सत्यनिष्ठ मुलाची गोष्ट आहे. जी संस्कारातून बोध देते. सकारात्मकतेचं बीजारोपण करते. आणि स्वप्नांना साकार करण्याचं बळ देते. साहित्य अकादमी पुरस्कार म्हणजे आबा महाजन यांच्या बालसाहित्यावरील निष्ठेचेच हे फळ आहे. बालसाहित्यातील पितामह धों.वे. जोगी यांनी सोव्हिएत लँड नेहरु अवार्ड पुरस्काराने गौरवान्वीत केलेली ही वाट आबांच्या साहित्य अकादमी पुरस्काराने अधिक प्रशस्त झाली आहे.


आबा महाजन यांनी बालसाहित्य हेच आपलं ध्येय मानलं. त्यात विविध प्रयोग केले. मायबोली अहिराणीचाही त्यात लिलया उपयोग केला. विद्यार्थ्याच्या वयाची आणि मनाची सांगड घातली. त्यांची आतापर्यंत १३ पुस्तकं प्रकाशित झाली असून त्यांना तीनदा शासनाचे राज्य पुरस्कार प्राप्त झाले आहेत. हेच त्यांचे या क्षेत्रातील श्रेष्ठत्व सिध्द करतात. साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेल्या 'आबाची गोष्ट' व्यतिरीक्त त्यांची मन्हा मामांना गावले (बालकथा), मन्हा गावले (बालकविता) ही आहिराणी तर गमतीच्या राज्यात , मौजमजा, चिऊचा मोबाईल, वाघोबाची गांधीगिरी, मी माझ्या बायकोचा, शेखचिल्लीची फूल टू धमाल, हिप हिप हुर्रे, खान्देश गाव हे बालकविता संग्रह प्रकाशीत आहेत. त्यांच्या बालसाहित्यावर संगीता म्हसकर, कविता महाजन, संगिता माळी आणि शालेय विद्यार्थीनी कु.मैत्री लांजेवार यांनी समिक्षा केली आहे.

सध्या ते शिरपूर येथे तहसीलदार पदावर कार्यरत आहेत. प्रशासकीय कामांमुळे त्यांना डॉ. किसन

पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करीत असलेले पीएचडीचे संशोधन थांबवावे लागले. बाबा भांड यांच्या बालसाहित्याचा अभ्यास हा त्यांचा संशोधनाचा विषय होता. याची खंत वाटते का असं विचारल्यावर, आता तुमच्या बालसाहित्यावर इतर संशोधन करतील असा बाबा भांड यांनी व्यक्त केलेला विश्वास आपल्याला लेखन बळ देतो असं ते म्हणाले.

अभिनंदनासाठी त्यांना फोन केल्यावर त्यांनी विनम्रतेने आपले हे यश मुलांच्या चेहऱ्यावर दिसणाऱ्या आनंदा एवढेच मोलाचे वाटते असे सांगितले. शालेय पुस्तकं ते विद्यापीठीय एम. ए. च्या अभ्यासक्रमात त्यांचं साहित्य समाविष्ट आहे. तरीही जमिनीशी नाळ जोडून असलेला हा साहित्यिक मित्र आबा महाजन (९४२३४९२०८८) भविष्यात नवनवीन यशाची शिखरं पादाक्रांत करील याची मला खात्री आहे. त्यासाठी त्यांना आभाळभर शुभेच्छा.

– ९८३४६१४००४



# सुरेख कथासंग्रह 'आबाची गोष्ट'

विलास पगार

लहानग्यांसाठी साहित्य निर्माण करायचे म्हटले, की मुख्यत: त्यांच्यावर होणारे संस्कार प्रामुख्याने लक्षात घ्यावे लागतात. त्यामुळेच की काय, दर्जेदार बालसाहित्य संख्यात्मकदृष्ट्या कमी प्रमाणात आढळते. अगदी मोजके लेखक-कवीच असे आढळतात. जे संस्कारमूल्य जोपासून दर्जेदार साहित्याची निर्मिती करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न करतात. अशा साहित्यिकांमध्ये आबा गोविंदा महाजन हे त्यांच्या अहिराणी भाषेतील पहिल्या बालकवितासंग्रहामुळे साहित्य क्षेत्रात चांगलेच परिचित झाले आहेत. ग्रामीण बोली, या बोलीतील भाषिक सौंदर्य व्यक्त करणारे त्यांचे लेखन कुमारांना प्रेरणा देणारे असेच आहे. श्री.महाजन यांचा 'आबाची गोष्ट' हा बालकथा संग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे. मुलांना गोष्ट ऐकायला आणि वाचायला आवडते, याचे भान ठेवून महाजन यांनी अगदी साध्या सोप्या भाषेत या कथा लिहिलेल्या आहेत. त्यातही शालेय जीवन हे संस्कार करण्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचे असते. या वयात झालेले संस्कार मुलांना जीवनभर पुरतात. याचे भान ठेवून त्यांनी या कथा लिहिल्या आहेत. असे असले, तरीही या कथांचे तंत्रही वेगळे आहे. कथा ही कथन करावी लागते व त्यासाठी कशी ओघवती शैली वापरायला हवी, याचे उत्तम उदाहरण म्हणून महाजन यांच्या कथांकडे पाहिले पाहिजे. महाजन यांचे बालपणही खेडेवजा गावात गेल्यामुळे त्यांनी ग्रामीण जीवन प्रत्यक्ष अनुभवलेले आहे. त्यामुळेच त्यांच्या कथा अस्सल भाव व्यक्त करतानाच बालवाचकांना अधिक भावतात. महाजन यांच्या कथांचे आणखी एक वेशिष्ट्य म्हणजे, त्यात वाचकांना धडपडणारी मुले भेटतात. बऱ्याचदा खेड्यातील मुले म्हटले, की ती भित्री असतात असे म्हटले जाते, पण या कथांमध्ये मात्र आलेल्या संकटांचा सामना कसा करायचा? जिद्दी मुले काय करू शकतात? मुले किती प्रामाणिक असतात?, या व अशा अन्य प्रश्नांची उत्तरे या कथा वाचताना मिळतात. या छोटेखानी संग्रहात एकूण १७ कथा आहे.गारपीट ही पहिलीच कथा मुलांचे भावविश्व उलगडून दाखवणारी आहे. दिनूची कमाल, दोस्ती राम रहीमची, गफूरभाई रिक्षावाला, कष्टाळू चोर या कथाही खूपच वाचनीय झाल्या आहेत. मनकरणाबाईचा नातू ही कथा, परिस्थिती कधीच यशासाठी अडचण ठरत नाही, हे सांगून जाते. 'गुरंढोरं आणि पुस्तकं' या कथेतून लेखकाने जीवनात कितीही संघर्ष आला, तरी हार मानायचे नसते कारण सत्याचा विजय होतोच, विजय होतोच, हा संदेश दिला आहे. एकूणच खानदेश भागातील बोलीसौंदर्य टिपणाऱ्या या कथा शालेय विद्यार्थ्यांना जीवनात नवे काही करण्यासाठी प्रेरणा देणाऱ्या व बालमनावर संस्कार करणाऱ्या आहेत.

-

# किशोरांसाठी बोधप्रद कथासंग्रह 'आबाची गोष्ट'

गिरीश दुनाखे

बालसाहित्य क्षेत्रात जळगावचे आबा गोविंद महाजन हे नाव परिचित आहे. त्याचे अनेक कवितासंग्रह प्रसिद्ध असून एक संग्रह अहिराणी भाषेत आहे. पेशाने जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयात तहसीलदार म्हणून कार्यरत असलेल्या महाजन यांचा 'आबाची गोष्ट' हा कथासंग्रह प्रकाशित झाला असून बात १७ कथा आहेत. हा संग्रह किशोरवयीन मुलांसाठी आहे. शहर आणि ग्रामीण वातावरण रेखाटलेल्या या संग्रहात काही ठिकाणी खानदेशी भाषा वापरलेली असून त्याचा गोडवा सुखावून जातो. गारपीट, टोपणनाव, नयनदान, शाळेतील दिवस, लाखोंचा सलाम, बोकमकालाही, मनकरणबाईचा नातू, मॅट्रिक, मला शिकायचंय, बोलका वर्ग, कष्टाळू चोर, दिनूची कमाल, गुरंढोरं आणि पुस्तक, गफूर रिक्षावाला या कथा नुसत्या वाचनीयच नाही तर मनाला भिडणाऱ्या आहेत.

गारपीट या कथेतून अर्जुन पाटील आणि त्यांच्या गायवासरांचा जीव वाचविताना जे वर्णन आले आहे हे ते वाचून हृदय पिळवटून जाते. टोपणनाव या कथेत राकेशचे आबा महाजन कसे झाले हे वर्णन असून नयनदान या कथेत पाच वर्षाच्या लाडक्या मुलीचा अकाली मृत्यू होऊनहीं आई-वडिल तिचे डोळे मरणोत्तर नेत्रदान तर कररतातच पण डॉक्टरांवर हल्ला करु नका असा सल्लाही यात आहे. शाळेतील दिवस कुसंगतीने बिघडलेल्या मुलांना गावचे एक गृहस्थ अद्दल घडवितात व ती मुले कशी सुधारतात, हे मार्मिकपणे सांगितले आहे. लाखोचा सलाम या कथेतून नामदेव हे पिता त्यांची मुलगी व मुलगा यांच्यात भेद करू नका, असा संदेश आहे. टवाळखोर मुले रंजक वर्णन आहे. मनकरणबाईचा नातू या कथेतून वाईट कर्माला शिक्षा मिळते हे सांगताना डोळ्यात पाणी येते. मॅट्रिक कथेतील मुलगा अतिशय गरिबीतून ७८ टक्के मार्कांने उत्तीर्ण होतो व आपल्या भावंडांचा नापास होण्याचा विक्रम मोडीत काढतो, असे दाखविण्यात आले आहे.

मला शिकायचंय ही कथा शिक्षणावर आधारित आहे. तर बोलका वर्ग या कथेतला जिद्दी शिक्षक अथक प्रयत्नाने शाळा चालवून संपूर्ण गावाला शिक्षणाची गोडी कशी लावतो याचे वर्णन आहे. कष्टाळू चोर या कथेतील सुशिक्षित मुलगा

नोकरीसाठी वणवण फिरतो. पण नोकरी न मिळाल्याने लोकांच्या रिक्षा चोरून त्या चालवून गुजराण करत असतो. तेव्हा पोलिस त्याला पकडतात. पण त्याची जीवनकहाणी ऐकून जामीन मिळवून देतात.

आबाची गोष्ट ही शीर्षक कथा ह्रदस्पर्शी आहे.लेखक हा तहसीलदार झाल्यानंतर गाडीतून ऑफिसला जाताना त्याला बोरविक्या मुलगा भेटतो. ते त्याच्याकडून बोरं घेतात. त्यांनीही लहानपणी गरिबीत बोरं विकून स्कॉलरशिपचे पुस्तक घेतलेले असते.

या प्रसंगाची त्यांना आठवण येते आणि वाचकाचे डोळे पाणावतात.

-9623231463



# कठीण परिस्थितीतून मार्ग काढायला शिकवणाऱ्या कथा

बबन शिंदे

आबा महाजन हे नाव मराठी बालकुमार वाचकांना नवे नाही. गेल्या पंधरा-वीस वर्षांपासून त्यांच्या दर्जेदार लेखणीमुळे ते सर्वदूर परिचित आहेत. त्यांच्या कथा- कविता अनेक मासिकांतून बालवाचकांना वाचायला मिळतात. नुकताच त्यांचा नवाकोरा कथासंग्रह प्रकाशित झाला आहे तो म्हणजे 'आबाची गोष्ट'. या कथासंग्रहाला असे नाव दिले आहे. या कथेत आबा महाजन यांनी आपल्या शालेय जीवनातील प्रसंग अतिशय व्यवस्थितपणे मांडले आहे. मुळात प्राथमिक शिक्षक असणारे आबा महाजन जिद्द, चिकाटी व खडतर मेहनतीच्या जोरावर महसूल खात्यात अधिकारी झाले आहेत.

एकदा जिल्हाधिकारी साहेबांच्या कार्यालयात मिटींगला जात असताना नांद्रा गावाच्या फाट्याजवळ बोरं विकणाऱ्या मुलाकडे त्यांची नजर गेली. गाडी थांबवून त्यांनी त्या शाळकरी मुलाकडून बोरं विकत घेतली. चालत्या गाडीत बोरं खाताना त्यांना त्यांच्या बालपणी त्यांनी नथ्थुमियाच्या यात्रेत बोरं विकून स्कॉलरशिपचे पुस्तक विकत आणल्याचा प्रसंग आठवला. स्कॉलरशिपचं पुस्तक स्वकष्टाने आणले खरे, पण शाळा व शेतकामाच्या व्यापातून वेळ मिळत नसल्याने त्यांनी गुरे राखत अभ्यास केला. अनेकदा गुरे चंपाशेटच्या बांधावर जायची. शेट रागावायचे. पुस्तक वाचून कुठे मामलेदार होणार आहेस? असे खोचक बोलायचे. तरीपण लेखक न खचता अभ्यासात मग्न होत असत. सततच्या जागरणामुळे एकदा त्यांची तब्येत बिघडली असल्याचे त्यांनी कथेत नमूद केले आहे. अंगात ताप भरला असतानाही त्यांनी स्कॉलरशिपची परीक्षा दिली. त्यात त्यांना यश आले नाही. राणे सरांनी त्यांना धीर दिला. भविष्यात मोठा अधिकारी होशील असा विश्वास व्यक्त केला. राणे सरांचे बोल खरे ठरले. या कथेतून त्यांनी स्वत:च्या आयुष्यातील एक प्रसंग सांगून बालकुमार वाचकांना संदेश दिला आहे. परिस्थितीला न डगमगता तोंड दिल पाहिजे. अपयश आल्यास खचून न जाता धैर्याने तोंड दिले संकटाला घाबरून आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रेरित करण्याचा प्रयत्न कथाकाराने केला आहे आणि त्यात ते पूर्णपणे यशस्वी झाले आहेत.

'दोस्ती राम रहिमची' या कथेतून त्यांनी जातीयतेला मूठमाती देवून संकटाच्या वेळी जो धावून येतो तोच खरा मित्र असतो हे दाखवून दिले आहे. चुगलखोर माणसावर विश्वास न ठेवता वस्तुस्थिती जाणून घेण्याचा मोलाचा संदेश दिला आहे. 'गुरं ढोरं आणि पुस्तकं' या कथेतून त्यांनी कथाकाराने

स्वत:च्या उदाहरणातून हे सिध्द दिला आहे. आवड असली की सवड मिळतेच. कारण कथाकाराने स्वत:च्या उदाहरणातून हे सिध्द करून दाखविले आहे. शालेय जीवनात घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे शेतात गुरं राखूनही त्यांनी वर्गात पहिला दुसरा नंबर कायम टिकवून ठेवला होता. शेवटी कष्टाच्या बळावर आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होवून साहेब बनून दाखवले. हुशार, कष्टाळू माणसे हातावर विश्वास ठेवूनच नेत्रदिपक यश मिळवितात असे दाखवून दिले आहे.

'मनकरणाबाईचा नातू' ही कथा वाचकाला खिळवून ठेवते. स्वत:चा मुलगा जन्मदात्या आईला कसा फसवतो. घरदार सर्व विकून आईला रेल्वे स्टेशनवर सोडून पत्नी व मुलाला घेऊन पोबारा करतो. या कथेतून समाजात वाढत असलेल्या अपप्रवृत्तीचे दर्शन घडते. 'दिनूची कमाल' या कथेतून दिनूने संकटात मदतीचा हात पुढे करावा. जीवावर बेतलेल्या संकटातून सोडवण्याचा उपदेश केला आहे. 'बोलका वर्ग' या कथेत कथाकाराला जेव्हा शिक्षक म्हणून छोट्या खेड्यात नोकरी मिळाली तेव्हा त्यांनी मोठ्या धाडसाने सर्व खेडेगाव बदलून टाकलं. 'केल्याने होत आहे रे आधी केलेचि पाहीजे' याचं उत्तम उदाहरण होय. सुरूवातीला नकोशी वाटणारी शाळा आता स्वत:ला हवीहवीशी वाटत होती. प्रतिकुल परिस्थितीवर मात करण्यासाठी तनमनधनाने राबले की अनुकूल परिस्थिती निर्माण करता येते हे सिद्ध करून दाखविले आहे. 'गारपीट' ही कथा ऐन सुगीत गारपीट झाल्यावर कास्तकाराचे किती हाल होतात, हाती आलेला घास गळून पडावा तशी त्याच्या मनाची अवस्था होते. निसर्गाच्या लहरीपणाचे गंभीर परिणाम शेतकऱ्याला कसे सहन करावे लागतात ह्याचे हुबेहुब चित्र साकारले आहे.

'कचेरी' या कथेत उत्पन्नाचा, जातीचा व कोणताही दाखला काढण्यासाठी कारकून असे सतावतात. तलाठी सर्व कागदपत्रे एकटाच न सांगता एक एक सांगून चकरा मारायला लावतात. चिरीमिरी देणाऱ्याला कागदपत्रांची पूर्तता पूर्ण न करताच ताबडतोब काम करून देतात. साध्या सरळ माणसाला हेलपाटे मारायला लावतात. साधा कोतवालही त्यात कमी नसतो. त्याची अरेरावीची भाषा हे अगदी तंतोतंत कथेत मांडले आहे. शेवटी ती व्यक्ती त्रासिक मुद्रेने कसा भडकतो हे कथाकाराने अतिशय पद्धतशीर मांडले आहे. 'गफूरभाई रिक्षावाला' ही कथा गफूरच्या प्रामाणिकपणा दाखवून देते. एका शिक्षकाचे पाच लाख पंचवीस हजार रूपये एवढी रक्कम तो परत करतो. ती बातमी वर्तमानपत्रात झळकते. गफूरचा प्रामाणिक स्वभाव पाहून डॉक्टर सकीनाचे बील घेत नाही. सकीना ही गफूरमियाची पत्नी अतिदक्षता विभागात असताना तो सरळ रक्कम परत करण्याला प्राधान्य देतो.

'आबाची गोष्ट' यातील सर्व कथा वाचनीय आहेत. खेड्यातील माणसांच्या जगण्यासंदर्भातील आहेत. कथा स्वानुभावांवर आधारित आहेत. भाषा सरळ, साधी, सोपी व रसाळ आहे. आशय, विषय, मांडणी उत्तम आहे. काही कथेत अहिराणी भाषा वापरल्यामुळे अधिक जिवंतपणा वाटतो. कथेत ग्रामीण भागातील जीवन चित्रीत केले आहे. कथा बालकुमारांना परिस्थितीचा जाणीव करून देऊन प्रेरणाही देतात. बालकुमारांचे भावविश्व, संस्कार व उपदेश कथांतून ठळकपणे जाणवते. कथा आत्मपर असल्या तरी त्यात पाल्हाळ नाही. कथा वाचकांना नक्कीच आवडतील. मुखपृष्ठ व आतील रेखाटने पुस्तकोच वाङ्:मयीन मूल्य वाढवणारे आहेत. छपाई व बांधणी उत्तम आहे. कथेचे आशय विषय मांडणी चांगली आहे. कथेत लेखकाचे निवेदन जास्त आहे. कथेतील पात्रे फारसे संवाद साधत नाहीत. कथा

# ‘आबाची गोष्ट’ कथासंग्रह किशोरवयीन मुलांसाठी प्रेरक.

उमेश काटे

शाळकरी मुलांचे भावविश्व हे वेगळेच असते. बोधकथांच्या माध्यामातून मुलांमध्ये संस्कार रूजविण्यासाठी साहित्यिक कवी तथा मालेगाव येथील तहसीलदार आबा महाजन यांनी ‘आबाची गोष्ट’ हा कथासंग्रह वाचकांच्या भेटीला आणला आहे. पुणे येथील दिलीपराज प्रकाशनाने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. स्वत:चाच नवा शोध, बोध घ्यायला लावणारा श्री. महाजन यांचा हा कथासंग्रह किशोरवयीन मुलांसाठी प्रेरणादायी ठरत आहे...

महाजनच्या कथासंग्रहातील कथा या नावीन्यपूर्ण आहेत. प्रतिकूल अवस्थेत धडपडणारी, परिस्थितीशी दोन हात करणारी, प्रामाणिक, जिद्दी मुलांच्या संघर्ष कहाण्या आहेत. गारपीट, टोपणनाव, नयनदान, शाळेतील दिवस, लाखोंचा सलाम, मनकरणबाईचा नातू, मॅट्रिक, मला शिकायचंय, बोलका वर्ग, कष्टाळू चोर, दिनूची कमाल, गुरंढोर आणि पुस्तक. गफूर रिक्षावाला या कथा नुसत्या वाचनीयच नाही तर मनाला भिडणाऱ्या आहेत. या कथासंग्रहातील कथांची भाषा साधी, सोपी, पसन्न, सहज सुलभ व ओघवती आहे. यातील शब्दांमध्ये सच्चेपणा आहे. आपलेपणा आहे. म्हणून या कथा सर्व वयाच्या वाचकांना खिळवून ठेवतात. चांगल्या कामासाठी प्रेरणा देतात व वाचनाचा निखळ आनंद पुरवितात. अतिशय सुंदर असा कथासंग्रह पालक व शिक्षकांसाठी संग्रही असाच आहे.

या कथासंग्रहाचे किशोरवयीन मुलांच्या चित्रणात प्रेरणा दृष्टी आहे. सामाजिक सहिष्णुता, समता, सत्य, सचोटी आणि चांगुलपणा या तत्त्वांच्या आविष्कार करणारा आहे. यातील बहुतांश कथा या आत्मपर यांच्या स्वरूपाच्या कथांचा आटोप हा अतिशय सांक्षेणी स्वरूपाचा आहे. गद्य अतिशय प्रभावी आणि अल्पाक्षरी आहे. खानदेशी परिसरनिष्ट संवाद आणि अकल्पित उद्‌भवणारे नाट्य यांनी या कथांना वेगळे गद्य परिणाम प्राप्त करून दिले आहेत. आबा महाजन यांचे बालसाहित्य विविध स्वरूपी आहे. यापूर्वी खानदेशी बोलीतील त्यांच्या प्रयोगशील कविता वैशिष्ट्यपूर्ण ठरल्या आहेत.

शीर्षकाची पार्श्वभूमी

‘आबाची गोष्ट’ ही शीर्षक कथा ह्दयस्पर्शी आहे. लेखक हा तहसीलदार झाल्यानंतर गाडीतून ऑफिसला जाताना त्याला बोरविक्या मुलगा भेटतो. ते त्याच्याकडून बोरं घेतात. त्यांनीही लहानपणी गरिबीत बोरं विकून स्कॉलरशिपचे पुस्तक घेतलेले असते. या प्रसंगाची त्यांना आठवण येते आणि वाचकांचे डोळे पाणवतात. ‘टोपणनाव’ या कथेत राकेशचे आबा महाजन कसे झाले, याचे वर्णन आहे. ‘गारपीट’ या कथेतून नायक आणि त्यांचा गाय-वासराचा जीव वाचवताना जे वर्णन आले आहे. हे वाचून ह्दय पिळवटून जाते.

-9423579827

# बालकांचे भावविश्व समृद्ध करणारा कथासंग्रह

**गोविंद कदम**

आबा गोविंदा महाजन हे मराठी साहित्यात विशेषत: बालसाहित्यात सकल मराठी मुलुखातील सर्वपरिचित नाव. कल्पकता व आत्मपर कथनातून साकारलेला त्यांचा 'आबाची गोष्ट' हा १७ कथांचा समावेश असणारा संस्कारक्षम कथासंग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे. कथेत अतिरंजकता आणून कथेची व्याप्ती वाढवण्यापेक्षा ओघवत्या भाषेत नेमका आशय सांगून हा कथासंग्रह लिहिण्यात आला आहे.

सर्वांना समजेल-उमजेल अशा साध्या-सोप्या-सरळ भाषेत लिहिलेली एक-एक गोष्ट आपल्या चंचल मनाला वेगवेगळ्या भावविश्वात घेऊन जाते. वाक्यरचना छोटी-छोटी असल्यामुळे लहान मुलांना वाचण्यास सोपी वाटते. प्रत्येक गोष्ट, त्या गोष्टीतील प्रसंगाची मांडणी, गोष्टीची भाषा अन् आशय वाचकाला आपला वाटतो, आपल्या भावविश्वाशी निगडित वाटतो. त्यामुळे 'आबाची गोष्ट' वाचताना नकळतपणे वाचक अनेक वेळा स्वत:च्या भावविश्वात, स्वत:च्या भूतकाळात 'आबाची गोष्ट' शोधण्याचा प्रयत्न करतो.

प्रत्येक गोष्ट कोणत्या नैतिक मूल्यांची ठेवण आपल्या मनात रूजवून पुढे जाते. काही गोष्टीत आपले प्रौढ मन नि:शब्द होते तर काही ठिकाणी आपले मन प्रौढपण विसरून बालमनात हुंदडायला लागते. काही गोष्टी विचार करावयास भाग पाडतात, त्यामुळे वाचताना आपलं मन कधी शेताच्या बांधावर जाऊन शेतकरी बांधवांच्या चेहऱ्यावरील दु:ख वाचण्याचा, वाचून ते वेचण्याचा प्रयत्न करते वर कधी आपलं मन शाळेच्या बाकावर जाऊन रमते आपल्या रम्य बालमनात. निवेदनात मराठी बोलीभाषा तर संवादात खानदेशी बोलीभाषेचा सुयोग्य वापर केल्यामुळे कथानक वाचताना गोडवा निर्माण होतो.

ह्या पुस्तकातील पहिलीच गोष्ट मनाला स्पर्श करून हृदयात जाऊन स्थिरावते. पहिल्या गोष्टीतील अर्जुन पाटील व त्यांची मुक्या प्राणिमात्रांवरील भूतदया अन् त्यापायी त्यांना गमवावा लागलेला स्वत:चा जीव हे वाचून आतून खूप भारावून येतं. ह्या गोष्टीतून बाहेर पडून दुसरी गोष्ट वाचण्यास मिळते ती आबांच्या टोपणनावाची. पहिल्या गोष्टीत गहिवरून गेलेले वातावरण आबाच्या टोपणनावाची गोष्ट वाचली की थोडं हलकेफुलके होते अन् आपल्या समोर उभे राहते ते आपलं बालपण व बाहेर पडतात त्या दडून बसलेल्या निरागस बालपणातील असंख्य आठवणी.

पुढच्या गोष्टीतून आबा आपल्याला सरळ घेऊन जातात आदर्श मूल्याच्या बोधकथेकडे. रिक्षावाल्या गफूर भाईकडे. स्वत: आर्थिकदृष्ट्या अत्यंत प्रतिकूल स्थितीत असताना देखील टाहो फोडतो, पण आभाळा

एवढ्या दु:खात देखील नयनाच्या पालकांनी दाखवलेली उदात्त मनाची व पुरोगामी विचारांची भूमिका मनाला खूपच भावते. ह्या कथेत पात्रापेक्षा कथानक वरचढ ठरते. शाळेतले दिवस प्रामाणिकपणा तर लाखोंचा सलाम ही गोष्ट कमालीच्या जिद्दीची व धाडसाची शिकवण देते. बोकयकाला या आत्मपर कथेतून अहिराणी बोलीभाषेचा आस्वाद घेता आला, जी भाषा माझ्यासाठी नवखी होती. पुढची कथा मनकरणाबाईंची, ही कथा वाचताना आईची लेकराची अफाट माया अन् मुलाची निर्दयता पाहून ह्रदय पिळवटून डोळ्यातून आसव बाहेर पडले. नात्यातील रूंदावत चाललेली भिंत लेखकांनी या कथेतून मांडली. मॅट्रिक या आत्मपर कथनातून चुका-चुकांतून कसा शिकत गेलो, कसा घडत गेलो याचे दर्शन घडते. याशिवाय शिक्षकाबद्दलची कृतज्ञता अनुभवयास मिळाली. मला शिकायचंय या कथानकातून ग्रामीण भागात स्त्री शिक्षणाची पेटलेली मशाल दाखवली आहे. हीच कथा इयत्ता चौथीच्या पुस्तकात आहे.

३००-३५० लोकवस्तीच्या गावात एकशिक्षकी शिक्षकांऩी घेतलेल्या मेहनतीच्या बळावर शाळेचा झालेला कायापालट, त्यातून बालकांचा झालेला सर्वांगीण विकास व त्यामुळे शिक्षक म्हणून लेखकाला मिळालेले आत्मसमाधान बोलका वर्ग या आत्मकथेतून पुढे येते. परिस्थिती माणसाला कशी हबतल करते, परंतु योग्य वेळी उचित सल्ला व मार्गदर्शन मिळाले तर जगण्याची दिशा बदलून यशाच्या शिखरावर कसे पोहोचता येते, ह्याची शिकवण कष्टाळू चोर या कथेतून मिळते. कचेरी या आत्मकथेतून जातीच्या दाखल्यासाठी कचेरीत झालेली हेळसांड मांडली तर दिनूची कमाल या कथेतून प्रसंगावधान मूल्य सांगण्याचा प्रयत्न केला आहे. गुरंढोरं आणि पुस्तक या कथेतून परिस्थितीनुरूप लोक कसे रंग बदलतात याची शिकवण मिळते. दोस्ती राम-रहीमची ही कथा मैत्रीच्या अतूट नात्याचे व सर्वधर्मसमभावाचे संस्कार बालमनावर रूजविण्याचे मोठे काम करते. शेवटची कथा आबाची गोष्ट. ही कथा कष्टाचे फळ, कमवा व शिका, खरी कमाई इत्यादी मूल्यांवर आधारित आहे.

कथेतील कथानक वाचकाच्या डोळ्यासमोर उभे करणे, हे मोठ्या जिकिरीचे काम. लेखक आबा महाजन मात्र आपल्या सकस लेखन कौशल्याचा बळावर प्रत्येक कथेतील प्रत्येक प्रसंग वाचकाच्या डोळ्यासमोर जशाच्या तसा उभा करण्यात यशस्वी ठरले आहेत. लहान मुलांना समोर ठेवून जरी हा कथासंग्रह लिहिला असला तरी कथा वाचताना वाचकाला वयाचे बंधन आडवे येत नाही. लहान मुलांपासून ते अबालवृद्धांपर्यंत कोणीही वाचावे, असे हे पुस्तक. कनाथक व पात्र यांचा ताळमेळ राखण्यात लेखक यशस्वी ठरले आहेत. काही कथांत कथानकापेक्षा पात्राकडेच आपले लक्ष्य जास्त वेधते तर काही कथांत पात्रापेक्षा कथानक आपल्या जास्त स्मरणात राहते. गोष्ट लिहिताना जास्त पाल्हाळपणा न आणता मोजक्या शब्दांत कथानकाचे सादरीकरण केल्यामुळे प्रत्येक गोष्ट वाचण्याची उत्सुकता शिगेला पोहचते. पुढच्या गोष्टीत नेमकं काय असेल? ह्याची उत्सुकता मनाला लागते. ह्यातूनच लेखक-वाचक निकोप संवाद घडतो, हे लेखकाचे मोठे यश आहे. जिद्द, चिकाटी, सचोटी वृत्ती, खरी कमाई, प्रामाणिकता इत्यादी आदर्श संस्काराचे धडे देणारा हा कथासंग्रह विद्यार्थी, शिक्षक व पालकांनी नक्की वाचावा. आपल्या संग्रही ठेवावा. पुस्तकाचे शेवटचे पान वाचल्यानंतर शेवटी एक चांगले पुस्तक वाचले त्याचे समाधान मिळाले.

-9096903434

# मुलांना अनुवादक बनविणाऱ्या आबाची गोष्ट

युवराज माने

मुलांना अनुवादक बनवणाऱ्या 'आबांची गोष्ट 'ही गोष्ट आहे एका विद्यार्थीप्रेमी बालसाहित्यिकाची अन आमच्या शाळेतील आनंदाच्या झाडांची.गेल्या पंधरा वर्षांपासून आमच्या शाळेत दररोज 'वाचनाचा आनंदसोहळा'अविरतपणे सुरू आहे.या सोहळ्यात अनेक शब्दप्रभूंनी आमच्या लेकरांच्या मनावर राज्य केलंयकोणी कथेद्वारे,कोणी आपल्या आत्मकथेतून कोणी नाटकातून,कोणी ललित साहित्यातून,तर कोणी कवितेच्या ठेक्यातून...मुलांनीही उत्तम प्रतिसाद देऊन त्यांना आपलंसं केलंय.महाराष्ट्रातील बहुतेक सर्व साहित्यिकांची आमच्या वाचनाच्या आनंद सोहळ्यास हजेरी लागलेली आहे.हे आमच्या आनंदाच्या झाडांची खरी कमाई आहे.आता आमच्या मुलांना पुस्तक म्हणजे मजा,पुस्तक म्हणजे आनंद अस वाटतं.

आमच्या लेकरांची वाचनाची भूक अनेक शब्दप्रभूंनी ओळखून सढळ हाताने 'शब्दांचं धन' पाठवले. त्यातीलच एक बालसाहित्यिक म्हणजे 'आबा महाजन ' आबांची किशोरमधील कथा वाचून मुलांनी पत्राद्वारे त्यांच्या कथेविषयी कळवलं.त्यांनी कथेतून दिलेल्या ज्ञानाबद्दल,आनंदाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.मुलांच्या ह्या भावनांनी भारावून जाणार नाही तो साहित्यिक कसला! आबांना आमच्या मुलांच्या पत्रांनी इतकं आपलंसं केलं की,त्यांनी त्यांच्या स्वलिखित सर्व कवितांचे पुस्तकं भेट म्हणून पाठवली.आमच्या वाचनाच्या आनंद सोहळ्यात या सर्व कवितांच्या पुस्तकाचं वाचन,गायन सुरू झालं.इथं एक नवलाची गोष्ट घडली...मी मुलांना कवितांचं अभिवाचन करून दाखवत असतांना काही मुलं आबांच्या या कवितांचं आपल्या बोलीभाषेत तात्काळ रूपांतर करू लागले.त्याच झालं असं की आमची शाळा म्हणजे चार-पाच तांड्यानी मिळून बनलेलं एक आनंदाचं झाड! जिथं सर्वच मुलं बंजारा भाषिक.या आबांच्या मराठीतील कविता हे लेकरं आपल्या मायबोलीत सहज म्हणू लागले.हे मला खुप कुतूहलाचं वाटलं.मुलांच्या या नवनिर्मितीची छोटीशी भेट आबांना पाठवून द्यावी  अस मनात आलं आणि ते प्रत्यक्ष कृतीत उतरवलं.आबांच्या सर्व कवितांच्या पुस्तकाचे बंजारा बोली भाषेत आमच्या लेकरांनी सहज रूपांतर करून सुंदर हस्ताक्षरात लेखन करून आबांना पाठवलं.


स्वतः जन्म दिलेलं साहित्यरूपी आपत्य असं नवरूप धारण करून समोर येताच आबांच्या आनंदास पारावर उरला नाही.त्यांनी मुलाचं तोंड भरून कौतूक केलं.एवढ्यावर थांबतील ते आबा महाजन


कसले !मुलांनी पाठवलेलं हे बंजारा बोलीभाषेतील सर्व साहित्य पुणे येथील नामांकित दिलीपराज प्रकाशनाच्या संपादक मंडळास पाठवलं.इथेही मुलांच्या या सर्जनशील कृतीचं भरभरून कौतूक झालं.आणि काही दिवसांतच आपल्या मुलांनी आबा महाजनांचं बंजारा बोलीभाषेत अनुवादित केलेल्या साहित्यचं आम्ही प्रकाशन करू इच्छितो.आपली परवानगी असेल तर आम्ही प्रकाशित करू.असं आमच्या शाळेस त्यांनी एक परवानगी मागणारं पत्र पाठवलं.ही आमच्या लेकरांनी सहज केलेली कृती किती आनंददायी ठरली.आमच्या शाळेत मुलांना खूप आनंद झाला.पुढे काही दिवसातच महाराष्ट्रातील हा एखाद्या बोलीभाषेत अनुवादित झालेला पहिला प्रयोग 'आनंदेरो झाड ' या नावाने प्रकाशित झाला.ज्याचं प्रकाशन मुबंईत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये मा.दिनकर गांगल यांच्या हस्ते व किशोर मासिकाचे संपादक मा.किरण केंद्रे,प्रसिद्ध बालसाहित्यिक राजीव तांबे,श्रुती पानसे,वसंत काळपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालं.

हा एका बालसाहित्याचा खूप मोठा बहुमान ठरला.इथं लेखक आणि मुलं यांच्यातील उत्तम सृजनशील संवादचं म्हणावा लागेल. आबांच्या कवितांनी मुलांच्या मनात स्थान मिळवलं व त्यांच्या मायबोलीतही अमूल्य असा ठसाही उमटवला...आता आमची मुलं कोणत्याही कवितांच,कथांचं आपल्या बोलीभाषेत सहज अनुवाद करत आहेत. त्यांना आता पुस्तक वाचनाची खूप गोडी लागली आहे. यात आबा महाजनांचा प्रमुख वाटा आहे. आबाची गोष्ट या त्यांच्या पुस्तकास साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला हे आमच्या मुलांना कळलं तेव्हा मुलांनी एकच जल्लोश केला.त्यांनी आबांना पत्राद्वारे, चलभाषवरून अभिनंदन कळवले. ही असते खऱ्या साहित्यिकाची कमाई. ही कमाई आबांनी संपूर्ण महाराष्ट्रात केली आहे.

शेवटी एकच अपेक्षा आबाकडून असेल ती म्हणजे,बालकांना त्यांचा वाचन अधिकार मिळून द्यावा अर्थात मुलांना त्याच्या आवडीचं साहित्य वाचनास उपलब्ध करून दिलं पाहिजे. हा त्यांचा वाचनाधिकार आहे.

-७५१७४७८५७०





# आबाची गोष्ट : कुटूंब शाळा मित्र त्रिघटकीयसार



जगदीश पाटील

गेली तीस वर्षे एका निष्ठेने, आस्थापूर्वक, व्रत घेतल्यासारखी आबांची लेखणी बालसाहित्य प्रसवत आली आहे. साहित्याच्या एकाच क्षेत्रात न थकता-कंटाळता लेखन करणे ही तशी अवघड गोष्ट. अनेक लेखकांनी प्रौढ साहित्या बरोबर बाल साहित्यातही लेखणी चालवली. त्यांचे बाल साहित्याचे लेखन हे दुसऱ्या अथवा तिसऱ्या क्रमांकाचे लेखन असे राहिले आहे. मात्र आबांची पहिली आणि शेवटची पसंती बाल साहित्यच आहे. प्रौढ साहित्य लेखनाचा मोह त्यांना झालेला असू शकतो. नाही, असे नाही. ज्या निष्ठेने आबांनी केवळ बाल साहित्यच लिहिले त्याला मात्र तोड नाही. बाल साहित्याचा हा प्रवास आज साहित्य अकादमी पर्यंत येऊन पोहचला आहे.

सृजनाच्या क्षेत्रात ठरवून काही घडत नाही. ठरवून काही कोणास बाल साहित्य लिहिता येत नाही. मानस आणखी भावनिक वृत्तीची जडण घडणच सृजनात्मक लेखनाची तऱ्हा निवडते. माणसाच्या वयाचे काही कालि कटप्पे असतात. त्या त्या काळातल्या टप्प्यांचा प्रभाव हा मानस स्तरावर उमटत असतो. त्यापैकी बाल वय आणि किशोर वय हे अतिशय संवेदनशिल असते. या वयातल्य ाघटना- प्रसंगाचा संस्कार- विचारांचा प्रभाव आणि परिणाम हा दीर्घकालीन आणि अंतिमतः असतो. तो कधीही पुसला जात नाही. त्यातल्या भल्या बुऱ्या अनुभवांचे सार रूपी संचित पुढील आयुष्यभर सोबत करते. आयुष्याला अर्थ देते. अथवा अनर्थकारी बनविते. या साररूपी अनुभवांच्या संचिताचे पडसाद साहित्यातही उमटत असतात.

सगळेच लेखक बालपणीच्या या अनुभवातून गेलेले असतात.मात्र ते सगळेच बाल साहित्य लिहित नाही.अपवादानेच बाल साहित्यिक घडतो. लेखक ज्या परिसरात, कुटूंबात, ज्या संगतीत राहतो त्याचा काहीएक परिणाम त्याच्या व्यक्तित्वावर होत असतो. आणि त्याचे व्यक्तिमत्त्व घडत जाते.त्या त्या परिसरातील भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक आणि धार्मिक आचार-विचारांचा प्रभाव त्याच्या लेखनावर पडणे सहज शक्य असते. विशेषतः कुटूंब आणि त्यातील नातेसंबंध, मैत्रीसंबंध त्याच्या भावनिक बुध्दीमत्तेची पातळी व कौटुंबिक स्तरावर त्यांची सारावली नात्यांची वीण त्याच्या लेखनातील आशयाचे पोत ठरवित असतात. लेखक आणि त्याचे कुटूंब, त्या कुटूंबाची आर्थिक परिस्थिती, त्यांचे सामाजिक स्थान, त्यांचा परस्परावरील विश्वास, त्यांच्या धार्मिक श्रध्दा आणि आचरण हे सगळे घटक त्याच्या लेखनातील भाववृत्तींचे पोषण करीत असतात. त्या नुसार लेखनातील विषय, आशय, भाषा आणि रूपयांचे परिमाण ठरतात.

सामान्यतः सर्व प्रकारच्या लेखनावर वरील घटक प्रभाव टाकणारे असतात. मात्र त्यातल्या कुठल्या प्रभावाने बाल साहित्य लेखनाची पार्श्वभूमी अथवा उर्मी तयार होते हे सांगणे अवघड आहे.

'आबाची गोष्ट' मध्ये एकूण सतरा कथांचा समावेश आहे. त्यातील निम्म्या कथा ह्या प्रत्यक्ष लेखकाच्या बाल तसेच किशोर जीवनातील आहेत. बाकी कथा ह्या प्रत्यक्ष घडलेल्या वा काल्पनिक स्वरूपाच्या असून या सर्व कथांचा बाज किशोरवयीन मुलांसाठी लिहिलेल्या कथांचा आहे. या कथा आकाराने लघू कथा असून त्या प्रसंगोत्पात वा वेगवेगळ्या निमित्ताने किंवा लेखन उर्मीच्या ओघात स्फुरलेल्या आहेत. कुठल्याही साहित्याची पूर्व पार्श्वभूमी ही त्या लेखकाच्या बालपणाचे कुटूंब, शाळा आणि त्याचे मित्र हे असतात. विशेषतः आत्मकथनपर साहित्यात तर ते पूर्व लक्ष्यी प्रभावाने येतात. बाल साहित्य हे मुलतःच मुलांसाठी असल्याने मुलांच्या जीवनातील अभिन्न असलेले हे कालिक घटक त्याच्या लेखनाचे विषय होतात.

कुटूंब, शाळा आणि मित्र या बालकांच्या भावविश्वाशी अत्यंत निकटचा संबंध असलेल्या घटकांचा बाल साहित्यावर म्हणजेच त्यातल्या आशय आणि विषयाच्या अंगाने पडणारा प्रभाव हा तसा संयुक्तरित्या असतो.तो एकमेकांत मिसळून गेलेला असतो. त्याचे प्रसंगानुरूप वेगळेपण दाखविता येत असले तरी ते प्रत्येक वेळेस शक्य होत नाही.

वरील तिनही घटकांचा बाल साहित्यावरील प्रभाव 'आबाची गोष्ट' कथा संग्रहाच्या निमित्ताने जाणून घ्यावयाचा आहे. आशय-विषयाच्या अंगाने होणारा परिणाम आपल्याला तपासून पाहावयाचा आहे.

१) कुटूंब घटक : कुटूंब ही भारतीय सामाजिक संस्था आहे. कुटूंबात रक्ताची नाती असलेले सदस्य एकत्र राहतात. त्या दृष्टीने एकत्र कुटूंब पध्दतीतील लोकशाहीयुक्त वातावरण, सर्वसमावेशक हितवादी भूमिका, ज्येष्ठांचा आदर, त्यांच्या मार्गदर्शन व अनुभवाचा लाभ, सुखदुःखात सर्वांचा सहभाग, एकत्र सहवास, सहभोजन आणि सहविकास, जबाबदारीचे वाटप, सहकार्याची भावना, संस्कार आणि आदर्शाचे बीजारोपण, परिस्थितीचे समायोजन इ. वैशिष्ट्ये आढळतात.

लेखकाचे एकत्रित कुटूंब-

लेखकाचे बालपण एकत्र कुटूंबात गेले. आईच्या छत्रछायेला लेखक दीड वर्षाचा असतांनाच पारखा झालेला. घरची आर्थिक स्थिती निम्नस्तरिय. वडिल मोठ्या शेतकऱ्याकडे सालदार म्हणून.एक काका रेल्वेत. मोठा भाऊ किरकोळ भाजीपाला विक्रेता. एक बहिण. या अर्थाने एकत्र कुटूंब म्हणून सिमितच. आजी-आजोबा नसलेले व काका-काकू व चुलत भावंडाचा समावेश नसलेले. त्यामुळे एकत्र कुटूंब म्हणून त्याचा लेखना वरचा पूर्व प्रभाव हाही सिमितच म्हटला पाहिजे. तरी ही या सिमित प्रभावाला लेखनात्मक प्रतिक्रिया देतांना ती किती तीव्रतेने आली आहे याचा शोध घेता येतो.

कुटूंब घटकाचा कथांतर्गत प्रभाव 'गारपीट', 'गफूर भाई रिक्षावाला','नयनदान','लाखोंचासलाम', 'मनकरणाबाईचा नातू'या कथातून पाहावयास मिळतो.

मगारपीट' ही खरोखर घडलेली कथा. गावाच्या बाहेरील खळ्यात बांधलेले गाय व तिचे वासरू. ऐन पावसात त्यांना घरी आणण्याच्या इराद्यानं अर्जून पाटील खळ्याकडे निघतात. जोरदार कोसळणारा पाऊस, तुफान वारा यात पूर्णपणे ओले चिंब झालेले थंडीने गारठलेले अर्जून पाटील गाय- वासराचे दावे सोडण्याचा प्रयत्न करतात. त्यात गारांचा जोरदार पाऊस सुरू होतो. गाय-वासरू तर मोकळे होते. मात्र

जवळ कुठेच निवारा नसल्याने ते स्वतः गारांच्या मारात अडकून पडतात. व कोसळून पडतात.

कुटूंब घटकांत केवळ माणसेच असत नाहीत तर गुरेढोरेही असतात. व त्यांच्यावर ही तितकेच प्रेम केले जाते. काळजी घेतली जाते. शेतकरी असणाऱ्या अर्जून पाटलाने आपली जबाबदारी आपला जीव देऊन पार पाडली याचे हे जिवंत उदाहरण या कथेत येते.

तर आपल्या आजारी पत्निच्या उपचारा करिता पैश्यांची गरज असलेला व त्यासाठी चिंतेत असणाऱ्या गफूर रिक्षावाल्याला आपल्याच रिक्षात प्रवाश्याची राहून गेलेली पैश्यांची पिशवी सापडते. अूनायासे मिळालेल्या पैश्यांनी पत्निवर उपचार करणे सहज शक्य झाले असते. मात्र ज्या कुणाची पिशवी राहिली असेल त्याच्यावर काय प्रसंग ओढवला असेल या कल्पनेन ंहैराण झालेला गफूर प्रामाणिकपणे ती पिशवी मालकास परत करतो. हा प्रामाणिकपणा कुटूंब घटकातील एकमेकांवर असणाऱ्या विश्वासाचेच प्रतिक आहे. लेखकाने त्या विश्वासाला एका गरजू आणि सामान्य हाती सोपवून त्याचे रक्षणच नव्हे तर संवर्धन करविले आहे. माणसाने कठीण प्रसंगातही आपला प्रामाणिकपणा सोडू नये हा धडा 'गफूरभाई रिक्षावाला' या कथेतून मिळतो.

'नयनदान' ही कथा सुध्दा कुटूंबातील माणसांच्या एकमेकांप्रति असणाऱ्या त्यागाच्या भावनेला प्रत्यक्ष कथेच्या माध्यमातून दिलेल्या आकाराची आहे. लेखक या त्यागाला परिचित आहे. वडिल आणि भावाचे कुटूंबासाठीचा त्याग पाहत आलेला आहे. त्या मनातल्या त्यागाला या कथेत सर्वोच्च त्यागाचे रूप येते.

एकुलत्या एक मुलीला नयनाला मेंदूज्वरामुळे मृत्यू येतो. या फारमोठ्या दुःखातही नयनाचे आई- वडिल नयनाचे नेत्रदान करण्याचा फार मोठा निर्णय घेतात. हा अनपेक्षित असणारा नेत्रदानाचा मानवतावादी निर्णय अतुलनिय असा. तो घेतल्या जातो कुटूंबात सुख- दुःखाला सर्वांनी सारख्याच धैर्याने सामोरे जाण्याच्या व एकमेकांसाठी त्याग करायला सिध्द राहण्याच्या मानसिकते तून. लेखक त्याला आदर्शवादी रूप देतो.

'लाखोंचा सलाम' या कथेतील नामदेवला एकमेव मुलगी अनिता. मात्र आपल्याला मुलगा नाही म्हणून दुःखी असलेला. मुलगा- मुलगी भेद पाळणारा. कुटूंबातील समानतेच्या भावाला तिलांजली देऊ पाहणारा. मात्र त्याला अपघात होतो. दवाखान्यात तातडीच्या ऑपरेशन करिता पैश्यांची गरज पडते. मजूरीचे काम करणाऱ्या नामदेवकडे एवढा पैसा असणे शक्य नव्हते. तेव्हा शहरात आयोजित केलेल्या सायकल स्पर्धेत सातवीत जाणारी अनिता भाग घेते. स्पर्धा जिंकून वडलांचे ऑपरेशन करिता बक्षिस मिळविण्याची तिची जिद्द. मात्र यश तिला अंतिम चरणा जवळ नेऊन हुलकावणी देते. परंतु वडीलांच्या ऑपरेशन करिता जिद्दीने प्रयत्नांची केलेली शिकस्त तिला बक्षिसी मिळवून देते.

एका मुलीने वडीलां करिता केलेला हा मोठा प्रयास तिच्याविषयी वडीलांच्या मनात प्रेमाची व कौतुकाची भावना निर्माण करणारा ठरतो. मनातला भेद निघतो. आणि कुटूंबात आनंद येतो. या कुटूंबातला भेद मिटवून आनंद निर्माण करण्याचे लेखकाचा कथात्म हेतु सफल ठरतो. समानतेचे तत्त्व अंगिकारणाऱ्या कुटूंबाच्या भूमिकेत या भेदाला जागा अस ूनये हेच लेखकाचे मत आग्रहाने सिध्द होते.

'मनकरणाबाईचा नातू' ही एका वृध्देची कथा. एकुलत्या एका मुलाला काबाड कष्ट करून शिकवले व नोकरीला लावले. मात्र वडिल वारल्यावर घर व जमिनीवर डोळा असलेल्या मुलाने आईला फसवून तिच्या कडून अंगठा उठवून घर जमिन हडप केली. व

तिला निराधार सोडले. पोटच्या मुलाकडून झालेल्या विश्वासघाताने मनकरणाबाई जीव सोडते.

लेखक या ठिकाणी तिच्या नातवाला कुटूंब संस्थेच्या समर्थनार्थ उभे करतो. आणि त्याच्या तोंडून स्वतःच्या कृतघ्न बापा विरूध्द निषेधात्मक विरोध नोंदवितो. मनातल्या कुटूंबाच्या आदर्श रूपाची पाठ राखण करतो.

२) शाळाघटक :

शाळा हा घटक बालसाहित्याची एक मोठी पार्श्वभूमी असते. बालसाहित्यात शालेय घटक हा अतिशय सशक्त आणि महत्त्वाचा घटक असतो. हा प्रभाव सघन व खोल स्वरूपाचा असणे शक्य आहे. बालपणातील अनुभवाचे संपुट शालेय आठवणीं विना पूर्ण भरणे शक्यच नसते.विद्यार्थ्यांचे भवितव्य शाळेत घडते. शिक्षकांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव, त्यांची शिकवण, शिस्त, आज्ञापालन, शिक्षा व शाबासकी यातून विद्यार्थी जीवनात सकारात्मक वा नकारात्मक बदल घडून येतात.शालेय शिक्षणातून मन, मेंदू आणि भावनांचा होणारा विकास,आवडी निवडी,मतांना आकार येणे, शास्त्र व कलांचा परिचय होऊन मनाचा कल निर्माण होणे, मोकळे खेळकर, मैत्री युक्त वातावरण, सर्वांना समान संधी व सुविधा प्राप्त होतात.त्यातून समानता व एकतेची भावना व राष्ट्रिमूल्ये विकसित होतात.व आत्मविश्वास बळावतो.

लेखकाची शाळा-

सुरूवातीची खाजगी मराठी शाळेतला अल्पकालीन अनुभव,घरा पासून दूर.शाळेचा रस्ता रहदारीचा.अनोळखी मुले व कडक गुरूजी.त्यामुळे वाटणारी भीती.परिणामी शाळा टाळण्याकडे कल.पण लवकरच दुसऱ्या जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत रवानगी.ही शाळा कौलारू.त्यातले वर्ग,शिकवायला एकच एक गुरूजी दिवसभर,बदलीच्या खटपटीत असलेले गुरूजी,मित्र,नंतरच्या वेणूबाई, शिकविण्याची पध्दत,शाळेची व अभ्यासाची गोडी अशी ही शाळा.त्यानंतर येते हायस्कुल.लेखकाला खऱ्या अर्थाने भावलेली शाळा.प्रत्येक तासाला नवे सर,त्यांची शिकवण्याची वेगवेगळी पध्दत,बसायला बेंच,मोठे क्रीडांगण,प्रयोग शाळा,वेगवेगळ्या खेड्यातली मुलं,नवे आकर्षक वातावरण असलेली ही शाळा.या शालेय वातावरणाचा सकारात्मक प्रभाव लेखकाच्या कथांवर दिसून येतो.

* शालेय घटकाला मध्यवर्ती ठेवून ‘टोपणनाव’, ‘मॅट्रिक’, ‘मलाशिकायचय’, ‘बोलकावर्ग’ व ‘आबाची गोष्ट’ या कथा येतात.

‘टोपणनाव’ या कथेत लेखकाच्या टोपणनावाची मजेशीर गोष्ट आहे. लेखकाला न आवडणारे नाव,त्या वरून चिडवणारे मित्र व तेच त्याला मुख्य अधिकृत नाव म्हणून कसे चिकटते यांचे रंजक वर्णन आलेले आहे. त्या बरोबर लेखकाला न आवडणाऱ्या घरापासून लांब व वर्दळीचा रस्ता असलेल्या शाळेची नि त्यातून काढून जवळच्या व गल्लीतले मित्र जिथे शिकतायेत अशा शाळेची आणखी त्या शाळेत नाव टाकणाऱ्या लेखकाच्या कडक, संतापी तरी प्रेमळ असणाऱ्या आत्याची ही गोष्ट आहे. ही आत्या लेखकाच्या घरी नेहमीच दहा-पंधरा दिवसातून येत-जात राहणारी.सुरूवातीची शाळेची धास्ती घेतलेला लेखक शाळा टाळून बस स्टँडवर वेळ घालवत राहतो.हे घरी कळते आणि त्यामुळे लेखकाला मार बसतो. लेखकाचे शाळा चुकवण्याचे खरे कारण जाणल्या वर ही आत्या त्याला जवळच्या जि.प.मराठी शाळेत दाखल करते.शाळे विषयी उत्सुकता हरवलेला आबा येथे रमतो. व त्याला शाळे बद्दल गोडी निर्माण होते.

लेखकाला आई नाहीय.घरातले इतर मोठे

शेतीच्या कामात अडकलेले.लहान आबा कडे लक्ष द्यायला कुणाला सवड नाही.तेव्हा आईच्या मायेने लहान भाच्याला समजून घेणारी आत्याही कुटूंब व्यवस्थेच्या साखळीची च एक कडी आहे.योग्य वेळी तिने घेतलेल्या निर्णयाने लेखकाची शाळेसंबंधी नकारात्मकता बदलून सकारात्मक होण्याचे ती कारण बनते.अगदी सुरूवातीच्या दिवसात शाळेबद्दलची मनात तयार झालेली प्रतिमा पुढील काळात त्याला त्याच्या शिक्षणा विषयीच्या रूची वर प्रभाव टाकते.

शालेय शिक्षणाचा शेवट म्हणून मॅट्रिकचे महत्त्व होते. आत्यानं' नीट अभ्यास कर म्हणून बजावलेलं. बऱ्याचशा मुलांनी उन्हाळी सुटीचे वर्ग पूर्ण केलेले. इतर बरेच नियमित क्लासेस लावलेले लेखकाचे लंगोटी मित्र. लेखकाचा क्लास लावण्याचा हट्ट. तर त्यावर 'क्लास कशाला हवा. शाळेत शिकवतांना लक्ष दे' ही आत्याची बजावणी. पण रडून हटून लेखकाचा क्लास अखेर सुरू होतो.

या ठिकाणी मित्र व त्यांच्या आर्थिक परिस्थितीचे चित्रण येते. लेखकाचा मातीच्या धाब्यावरला अभ्यास, त्या नंतर सरांनी अभ्यासासाठी क्लास मध्ये उपलब्ध करून दिलेली अभ्यासाची सोय, लेखकाचे क्लासमधून मित्रां बरोबर पिक्चर पाहायला जाणे.या बद्दल सरांची बोलणी खाणे त्या बरोबरच रोज नियमित वडीलांचा डबा घेऊन शेतावर जाणे या अशा परिस्थितीतून लेखकाचे मॅट्रिक उत्तीर्ण होणे हा सगळा आलेख या कथेत येतो.

घरातले आत्या व वहिनीचे भांडण, त्यातून अबोला, घरातली ताणाची स्थिती वडिल व भावाचे कष्ट यांतून लेखकाने अभ्यासावर केंद्रित केलेले लक्ष हे सगळे येते. लेखकाने ठरविलेले अंतिम उद्दिष्ट व त्यासाठी जिद्द व चिकाटी ठेवून घेतलेले अभ्यासाचे कष्ट हे आदर्श वादी वर्तन पुढे येते.

त्याच स्वरूपाची शिकण्याची जिद्द व ध्यास 'मला शिकायचय' या कथेत तीव्रतेने येते. मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न या कथेत मांडण्यात आलाय. गावात चौथी पर्यंतच शाळा असल्याने पुढील शिक्षणासाठी स्नेहाला परगावी शिकायला आई-वडिल परवानगी नाकारतात. भाऊबंदांमध्ये कुणी मुलीला चौथीच्या पुढे परगावी शिकायला पाठवले नव्हते. त्याचाच कित्ता स्नेहाचे वडिल गिरवू पाहतात. परंतु तिचे शिक्षक व सरपंच त्याची समजूत काढतात. व स्नेहाचा शिक्षणाचा मार्ग खुला होतो.

शाळा आणि शिक्षणाची समान संधी सर्वांना मिळायला हवी, मुलगा- मुलगी असा भेद न करता त्यांना समानतेने वागविणे व त्यांना उन्नत विकासाचा मार्ग उपलब्ध करून देणे हा शालेय शिक्षणातून आलेला विचार आहे. त्याचे अनुसरण या कथेत येते.

'बोलकावर्ग' ही कथा, एखादा उमदा शिक्षक खेड्यातल्या शाळेची झालेली दुरावस्था कशा पध्दतीने पालटवू शकतो आणि त्याला रंगरूप देऊ शकतो याचे उत्तम उदाहरण. शाळे बद्दलची आस्था, आपुलकी व ओढ मुलांच्या तसेच पालकांच्या मनात निर्माण करणारा शिक्षक आदरास पात्र ठरतो. आधीच्या शिक्षकांनी दाखविलेली अनास्था ही त्या शिक्षकांनी शालेय शिक्षणातून प्राप्त केलेल्या ज्ञानाचाच अपमान असते. नकारात्मकता पोसलेल्या त्यांच्या शिक्षकी पेशालाही तो कलंक ठरावा.

मात्र येथे स्वतः लेखकानं शिक्षक झाल्यावर शाळेशी केलेल्या मैत्रीची सकारात्मक कृती येणाऱ्या असंख्य पिढ्याना मार्ग दाखविणारी आदर्शवत असेल.

'आबाची गोष्ट' ही कथा लेखकाच्या शालेय स्कॉलरशिप परीक्षेची आणि त्यात आलेल्या अपयशाची. पण खरेतर ती यशाचीच कहाणी म्हणावी लागेल. परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी लेखकानं

अभ्यासाच्या अतोनात घेतलेल्या कष्टाची. स्कॉलरशिपचे जुने पुस्तकही मिळेना तर नव्या पुस्तकाला पैसे सापडे ना म्हणून यात्रेत बोरं विकून पुस्तक विकत घेतले. रात्ररात्र जागून, जिवाचा आटापिटा करून, दोन-दोनदा वाचून अभ्यास केला. मात्र अळेरीस परीक्षेत अपयश आलं. या अनपेक्षित निकालाने लेखकाला अतिव दुःख होते. शिक्षक राणे सर धीर देऊन समजवतात. घेतलेले कष्ट, जिद्द, चिकाटी, ध्यास अन् अभ्यास असा वाया जाणार नसतो. घेतलेल्या कष्टाचे फळ भावी जीवनात नक्कीच मिळणार असते. त्यामुळे निराश- ना उमेद होऊन जाऊ नका' ही उमेद जागवणारी शिकवण घेऊन नव्या उमेदीने लेखक पुढील कठीण परीक्षेला सामोरे जातो व उत्तीर्ण होतो.

शालेय स्तरावर अपयशाने खचून न जाता सातत्य पूर्ण प्रयत्नाच्या पोटी यशाचा आशावाद व त्यातून लेखकाला मिळालेले बळ येथे महत्त्वाचे ठरते. विद्यार्थ्याचा प्रामाणिक प्रयत्न व शिक्षकांनी केलेले मार्गदर्शन याचा परिपाठ म्हणजे ही कथा आहे.

३)मित्र-

मित्र हा जीवनातील अविभाज्य घटक.मैत्री ही निरपेक्ष आणि निस्वार्थ भावनेतून निर्माण होते.मनातली गुपितं,गुजगोष्टी आणि सर्व प्रकारची देवाणघेवाण मैत्रीत होते.शालेय मित्र आणि गल्लीतले मित्र यामुळे मैत्र भाव,प्रेम आणि आस्था निर्माण होते.शालेय मित्रांसोबतचे अनुभव बहुदा मौज-मजेचे, आनंद दायी,रमणिय असतात. सोबतीला असणारे मित्र/सवंगडी आणि त्यातून विकसित होणाऱ्या मैत्री पूर्ण विश्वासार्ह आचरणाचे पडसाद ही खास असतात.

लेखकाचे मित्र-

लेखकाचे शालेय मित्र आणि गल्लीतले सवंगडी यांचा सहवास लेखकाचे भाव तसेच विचार विश्व समृध्द करण्यात झालेला आहे.त्यातून बरे-वाईटाचे ज्ञान,वेळेचे महत्व,सहकार्य आणि समभाव यांची आलेली जाण कथांच्या माध्यमातून निदर्शनास येते.

मित्र/ सवंगडी या घटकाचा प्रभाव 'शाळेतले दिवस', 'बोकायकाला', 'दोस्ती राम-रहिमची' या कथात आढळतो.

'शाळेतले दिवस' या कथेत गल्लीतले सवंगडी हेच शालेय मित्र सुध्दा. नदीवर पोहायला जाणारे.लेखकाला त्यांचा हेवा.मित्रांकडून पोहण्याचे धडे घेत पोहणे शिकलेला लेखक. मित्रां बरोबरीने धाडस,उत्सुकता, कल्पकता,नव्या आवडीच्या गोष्टी शिकण्याकरिता दिलेला वेळ आणि पत्करलेली जोखीम हे सगळे येते. पोहत असतांना गावातल्या मोठ्या माणसाने शिक्षा म्हणून उचलून नेलेले कपडे व तशा परिस्थितीत घराकडे जाण्यासाठी लढवलेली युक्ती हे मुलांच्या कल्पकतेचा उत्कृष्ठ नमुना म्हणावा.समुह भावना व अडलेल्या प्रसंगी उपाययोजना अंमलात आणण्याचे ज्ञान प्राप्त होते.मित्रांबरोबर प्राप्त केलेली ही जीवनकौशल्ये जगणे समृध्द आणि सुंदर करतात.

'बोकायकाला' ही कथा लेखक आणि त्याच्या सवंगड्यांनी आखलेल्या सहभोजनाची गमतीदार गोष्ट.शाळा आणि त्याभोवतीचे वातावरण याचा काहीएक परिणाम मुलांवर होतोच.लेखकाच्या शाळे भोवती दुकाने,पानटपऱ्या,हॉटेली व त्यावर रंगणाऱ्या पार्ट्या याचा परिणाम म्हणून मुलांनाही पार्टी कराविशी वाटते.वेगळ्या विचारांची ही सगळी मुलं काही एक मुद्द्यावर सहमत होतात.त्यांच्यात सहकार्याची भावना आणि जबाबदारी वाटून घेण्याची समज यामुळे येते.सर्व टोळके मिळून एकमताने काही कृती करत असले तरी अनुभव आणि माहिती ज्ञानाचा अभाव

यामुळे होणारी फजिती त्यातून गंमत तर होतेच परंतु काही एक कृती करण्याआधी संबंधित विषयाचे पुरेसे ज्ञान आवश्यक ठरते हे शिकायला मिळते.

'दोस्ती राम-रहिमची' या कथेत शालेय मैत्रीचा अतुट बंध प्रत्यक्ष जीवन जगतांना आलेल्या संकटात कसा अतुट राहतो हे फार उत्कटपणे सांगितलेय. दोन भिन्न धर्माच्या शालेय मित्रांत कख लावून त्यांच्यात वितुष्ट निर्माण करण्याचा प्रयत्न होतो. मात्र मैत्रीचा सच्चेपणा असल्याने गैरसमज हटतात. आणि पुनश्च मैत्री स्थिर होते. या कथेतून मैत्रीत होणारे गैरसमज शांतपणे विचार करून दूर करावे. ऐन वेळेस मित्राच्या मदतीला मनात कोणतेही किल्मिष न ठेवता धावून जावे हे मैत्रीचे मूल्य साकार होते. त्याला शालेय निरपेक्ष/ निस्वार्थ मैत्रीचा आधार मिळतो.

कुटूंब, शाळा व मित्र या त्रैघटकांचा एकत्रित पडलेला कथांतर्गत प्रभाव -

'कष्टाळू चोर', 'कचेरी', व 'गुरंढोरं आणि पुस्तक' व आणखी कथांच्या अनुषंगाने -

'कष्टाळू चोर' या कथेतील बबलू हा एक प्रामाणिक चोर. चोराचे हे वर्गीकरण एकदम वेगळे. जा त्याच हुशार आणि सुशिक्षित असलेला. नोकरी मिळत नसल्याने व व्याधीग्रस्त आईचा औषधोपचार करण्यासाठी रात्रभर चोरीची रिक्षा चालवून पैसे कमवणाऱ्या बबलूची गोष्ट येते.

परिस्थितीने तात्पुरता चोर बनलेला, नोकरी लागल्यावर चोरी सोडून देण्याचे मनातून ठरवलेला हा चोर खरेतर लेखकाच्या मनातील चांगुलपणाचेच प्रतिक आहे. योग्य मार्गदर्शन आणि योग्य वेळी अचूक दिशा मिळाल्यास त्याला नवा अर्थ देता येतो हा विश्वास ही कथा देते.चोराचे अधिक अधःपतन न होऊ देता त्याला योग्य वेळी उचित मार्ग दाखविणे हे लेखकाच्या तिन्ही घटकांचा संयुक्त परिपाक आहे. तो असा कथेतून उमटतो. कुटूंबातली तसेच शालेय संस्कारांची ही ठेव अप्रत्यक्ष कथेच्या माध्यमातून व्यक्त होते. बालपणी क्लास मधून चोरून पिक्चरला जाणारा लेखक मनातून लज्जित भावही बाळगतो. त्याचेच प्रकट रूप या कथेत मिळते.

'कचेरी' या कथे मधून समाजातील भ्रष्ट वृत्तीच्या माणसांकडून किशोरवयीन लेखकाला होणाऱ्या त्रासाचे वर्णन येते. कचेरीत गरजेच्या दाखल्यांकरिता कसे नाडून पाहिले जाते त्याचा उबग देणारा अनुभव लेखकाने मांडला आहे. या भ्रष्ट व कामचुकार प्रवृत्तीला रोखायचे असेल तर स्वतःच पुढे आले पाहिजे. प्रामाणिक आणि कर्तव्यतत्पर माणसांकडे अधिकाराचे सुत्रे गेली पाहिजेत असे मनापासून वाटणारा लेखकच खऱ्या अर्थाने येथे पुढे येतो. अभ्यासात कुठल्याच प्रकारची हयगय व घरी सोपविलेल्या ढोरं चारण्याच्या कामात कसर न करणारा लेखक मनातून आपल्या कामाशी प्रामाणिक आहे. त्यामुळे या संस्कारांना भ्रष्ट करणारे वर्तन त्याला चीड आणते.

'गुरंढोरं आणि पुस्तक' ही कथा लेखकाच्या आत्मकथनाचा सारांश म्हणावा अशी आहे. या कथेत लेखकाच्या कुटूंबाचे व लेखकाचे चरित्र उभे राहते. कुटूंबाचे गुराढोरां विषयीचे प्रेम, त्यांचे कष्टाचे शेतमजूरीचे जीवन, त्यातला प्रामाणिकपणा यांचे चित्रण येते. लेखकाचे शनिवार रविवार न चुकता ढोरचारण्याचा व सोबत पुस्तक वाचण्याच्या प्रसंगाचे हृदयस्पर्शी वर्णन येते. त्यावरून त्याला हिणवले जाणे व त्रास देणे घडते. यातून लेखकाच्या मनातल्या जिद्द, इर्षा, प्रयत्न आणि चिकाटीला खतपाणी मिळते. शाळा आणि शिक्षण या विषयी प्रखर निष्ठा बाळगणाऱ्या लेखकाच्या अंगभूत क्षमतांचा परिचय होतो. कुटूंब आणि शाळेतल्या अत्युच्च सुसंस्काराचा

आविष्कार लेखकाच्या प्रत्यक्ष जीवनात पाहावयास मिळतो. त्यातून प्रेरणा घेत नव्या पिढीला आपला मार्ग सुकर करता येईल.

या संग्रहातील 'टोपणनाव' कथेत लेखकाच्या कुटूंबातल्या आर्थिक परिस्थितीचा अंदाज येतो. सालदाराचे कुटूंब.कोरडवाह ूशेती.भावाच्या भाजीपाला विक्रीतून कुटूंबाचे जेमतेम चाललेले. कुटूंबासाठी सगळ्यांचा हातभार लागलेला.वडिल शेतावरच दगडमातीचं छोटं घरबांधून राहणारे. लेखकाकडे रोज संध्याकाळी वडलांचा डबा पोचवण्याचे काम. यातून कुटूंबाचा कष्टावरील विश्वास, गरिबीत ही सर्वांनी समाधानी राहण्याची वृत्ती,कामात सगळ्यांनी लावलेला हातभार या गुणांचा परिचय होतो.

लेखकाच्या घरी कायम वास्तव्यास असलेली आत्या. तिला आधार आणि आसरा देणारे लेखकाचे कुटूंब यातून कुटूंबाचा उदारदृष्टिकोनाचा परिचय मिळतो. वेळप्रसंगी तिाा सल्ला व शिकवण तसेच घरादारावर देखरेख या बाबींचीही ओळख होते. लेखकाला आईची उणिव भासू न देणारी ही आत्या. कथेत आलेले प्रत्यक्ष जीवनातले उदाहरण 'मनकरणाबाईच्या नातू' कथेच्या निमित्ताने पुढे येते. मनकरणाबाईला प्रत्यक्ष मुलाकडून आधार न मिळाल्याचे दुःखकथेत उजागर होते. कथेतील संबंधित पात्रे व कथे बाहेरील वाचक मनातून या निराधारपणाच्या दुःखाचे निराकरण अशा वृध्दांना आधार देण्याचा संकल्प देऊन करू पाहतात. हे त्या कथेचे यश म्हणता येईल.

'मॅट्रिक' मधील रस्त्यानं कविता गुणगुणत जाणारा लेखक.कविता पाठांतर आणि बालभारतीचे संपूर्ण पुस्तक वाचून काढणारा लेखक आणखी जुन्याच पुस्तकांना कव्हर लावून काटकसरीचे धडेगिरवणारा लेखक.या प्रसंगातून लेखकाची शाळा व शिक्षणाची ओढ दिसते. शैक्षणिक कल ही दिसून येतो. तसेच त्याच्या काटकसर करणाऱ्या वृत्तीचे दर्शन होते.

त्याच बरोबर शाळा बुडवून नदीत पोहणाऱ्या मुलांचे कपडे उचलून आणणारा मंसाराम आप्पा. गाव म्हणजे ही एक कुटूंब असते.यातील मोठी माणसे आपल्या मोठेपणाच्या अधिकाराचा वापर करत लहानांना शिस्त लावतात.व त्याचा आदरयुक्त धाक मुलेही बाळगतात. आपल्या स्वैरवर्तनाला आळा घालू पाहणाऱ्या मोठ्यांचा आदर करतांना त्यांचा संयमही दिसतो. शाळा बुडवून केलेले पोहण्याचे कार्यक्रम यामुळे चिडलेली आत्या व वेळीच तिने त्यास घातलेला आवर हे शिस्त लावण्याचे उदाहरण आहे. 'शाळेतले दिवस' या कथेत हे येते.

आबा महाजन यांच्या बालपणीचे व किशोर वयातले अनुभव व त्या अनुभवाचे सार म्हणजेच या कथा. कष्ट, प्रामाणिकपणा, जिद्द, चिकाटी, चांगुलपणाचा आग्रह, सामाजिक एकता व सहिष्णुता, कार्यतत्परता इ. गुणांचे दर्शन या कथांतून होते. संस्काराचे वहन सहज होते. ते बाहेरून आणून बसविले जात नाहीत. संवादी लय असणाऱ्या या कथांची गोष्ट होते. आणि गोष्टीतले हवेहवेसे रंजन मनाला ही भुरळ घालते.

या संग्रहातल्या सर्वच कथातून हे तिन्ही घटक संयुक्तरित्या आविष्कृत झालेले आहेत.बालसाहित्यात प्रकर्षाने जाणवणारे हे घटक त्यामुळेच संस्काराचे वाहक ठरतात. कालौघात या संस्कारांना अर्थ प्राप्त होतो.त्यांचा पक्केपणा व आग्रहाने मुलांचे संस्कारशिल मन दृढ होते.

-७२६२८०१९५९


# यशासाठी हवेत कष्ट, हेच सांगते 'आबाची गोष्ट'


स्मिता सराफ

मी एक शिक्षिका असून गेली पंचवीस वर्षे ग्रामीण भागात ज्ञान दानाचे काम करत आहे.जि.प.शाळा कापडणे येथे काम करत असताना मुलांसाठी दर्जेदार बालसाहित्य उपलब्ध करून देणे आणि त्यांच्यात वाचन संस्कृती वाढीस लागावी या दृष्टीने मी पुस्तकांच्या शोधात होते.मध्यप्रदेशातून पोटापाण्यासाठी कापडणे परिसरात स्थलांतरित झालेल्या परिवारात ही बहुदा पहिलीच शिकणारी पिढी. त्यातून त्यांची मातृभाषा पावरी .त्यामुळे भाषिक विकासासोबतच आशयही कसदार हवा होता अशाच मनस्थितीत मी काहीशी असताना 'आबाची गोष्ट' हे पुस्तक हातात पडलं आणि मी खुश झाले. पुस्तक वाचलं आणि हे पुस्तक जास्तीत जास्त मुलांपर्यंत पोहचवायचा मी निर्धार केला. सर्वच विद्यार्थी हे कष्टकरी परिवारातले. तळागाळातून आलेल्या अशा मुलांना वाचन आणि शिक्षणाकडे वळवून प्रेरणा देणं फार महत्त्वाचं होतं. मी 'आबाची गोष्ट' हे पुस्तक कायमच जवळ ठेवू लागले.परिपाठात दररोज एका कथेचे अभिवाचन करू लागले.लगेच कथेचा आशय ,मूल्ये ,सार यांवर विद्यार्थ्यांशी चर्चा करु लागले.त्याचवेळी रोज एका विद्यार्थ्याला पुस्तक घरी देऊन वैयक्तिक वाचन ही करुन घेतले.वर्षभरात जवळपास प्रत्येक विद्यार्थ्याने 'आबाची गोष्ट' या पुस्तकाचे वाचन केले.दरम्यान मी लेखकाशी समाज माध्यमातून जोडले गेले.मीच काय पण मुलेही त्यांच्याशी भरभरून बोलू लागली.उच्च पदावर काम करत असूनही त्यांचे पाय अजून जमिनीवर आहेत याचं मला अजूनही नवल वाटतं.सर्व कथांना ग्रामीण भागाची पार्श्वभूमी आणि अहिराणी बोलीची जोड असल्याने मुलांना कथा आणि लेखकही आपला वाटू लागला तर नवल ते काय? कुठलाही आव न आणता सहज , सोप्या आणि ओघवत्या शैलीत लिहिलेल्या कथा वाचकांच्या मनावर गारूड करतात. पुढे मुलांनी आबाची इतरही पुस्तके वाचली.तीही आवडली.माझा प्रत्येक आदिवासी मुलगा स्वतः मधला आबा शोधू लागला.या पुस्तकाला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला ही आताची गोष्ट.पण प्रत्येक बालकाच्या मनात जिद्द आणि प्रेरणा पेरण्याचं काम आबांनी केलं. माझी शाळा संपूर्णपणे आबामय झाली. हेच सगळं मी निकुंभे शाळेत गेल्यावर ही केलं.या शाळेत किशोरवयीन मुलांना शिकवण्याची मला संधी मिळाली.हळूहळू आबांच्या लेखणीने मुलांच्या हृदयावर आपले नाव कोरले.परिसर,बोली , ग्रामीण व्यक्तिरेखा आबानी अशा काही एकत्र गुंफल्या की प्रसंग अक्षरशः डोळ्यासमोर उभा राहतो.एकेक कथा म्हणजे जणू शंभर नंबरी सोने.शब्दांच्या पलीकडचा आशयही बालमनापर्यंत पोचतो.सर्वच कथांना ग्रामीण पार्श्वभूमी आहे.मुख्य म्हणजे या सगळ्या सत्यकथा

असल्याने प्रांजळपणे मांडलेल्या आहेत.पहिली 'गारपीट' ही कथा अस्वस्थ करणारी.टोपणनाव ही कथा आपल्याला थेट आबांच्या पहिलीच्या वर्गात नेते. 'गफूरभाई रिक्षावाला' ही कथा मूल्यांचं आपल्या जीवनातील महत्व अधोरेखित करणारी. 'नयनदान' ही कथा नेत्रदानाचे महत्व सांगणारी. 'शाळेतले दिवस' कथेने तर मला थेट माझ्या बालपणात फेरफटका मारुन आणले आणि स्मरणरंजनाचा आनंद दिला. 'बोकयकाला' ही कथा काल्यासारखीच छान जमून आली आहे.'दोस्ती रामरहीमची' ही कथा जात, धर्मापलीकडचं उदात्त मैत्र जोपासणारी. 'मॅट्रिक' कथेत प्रतिकूल परिस्थितीत जिद्द न सोडता कष्ट करणारा आबा दिसतो. शिक्षणाच्या परिसस्पर्शाने शाळकरी आबा, प्राथमिक शिक्षक आणि मग स्पर्धा परीक्षेतून नायब तहसीलदार हा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे.अनेकदा ग्रामीण भागातील मुलांना हुशार असूनही परिस्थिती,भाषा,राहणीमान यांमुळे न्यूनगंड असू शकतो.परंतु कष्ट आणि जिद्द असली तर ग्रामीण भागातील मुलेही यशस्वी होऊ शकतात हा संदेश देणाऱ्या या कथा प्रेरणादायी आहेत.त्यामुळे या पुस्तकाने माझे अनेक विद्यार्थी झपाटून अभ्यास करू लागले,वाचू लागले हे मी अनुभवले आहे.यातील 'बोलका वर्ग' ही कथा मला एक शिक्षक म्हणून आवडली. कारण एक शिक्षक म्हणून वर्गाची गुणवत्ता, उपस्थिती वाढवण्यासाठी केलेले प्रयत्न हे अनुकरणीय आहेत. काही कथा आबा महाजन या तहसीलदार अधिकाऱ्याचे अनुभव कथन करतात. आबांमधील संवेदनशील माणूस जिवंत असल्याचे या कथांतून प्रकर्षाने जाणवते.म्हणूनच केवळ प्रत्येक विद्यार्थ्याने नव्हे तर शिक्षक , अधिकारी, कर्मचारी यांनीही हे पुस्तक वाचलेच पाहिजे असे मला वाटते.आबांना साहित्य अकादमी पुरस्कार मिळाल्याच्या निमित्ताने माझ्या 'आबाची गोष्ट' शी निगडीत शैक्षणिक उपक्रमांना ही आज उजाळा मिळाला.आबांना साहित्य अकादमी पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन आणि भावी वाटचालीसाठी शुभेच्छा.

-८६९८२५७४०६



# वास्तववादी घटना बालसाहित्यात याव्यात

**आदित्य तानवडे**

तहसीलदार पदावरील प्रशासकीय काम आणि बालसाहित्याचे लेखन अशी दुहेरी सांगड घालून साहित्यसेवा करणारे आबा गोविंदा महाजन यांना शुक्रवारी साहित्य अकादमीचा बालसाहित्यासाठीचा पुरस्कार जाहीर झाला. अहिराणीतील शब्दांना लेखनातून न्याय देणारे आणि बालसाहित्यात वास्तववादी कथांचा आग्रह धरणारे आबा यांचा साहित्य अकादमीकडून गौरव होत आहे. या लेखनप्रवासानिमित्त त्यांच्याशी आदित्य तानवडे यांनी संवाद सांधला.

तुम्ही प्रशासकीय पदावरचे काम आणि लेखन या दोन्ही गोष्टी कशा सांभाळता?

– प्रशासकीय पदावर काम करतांना कामाची व्याप्ती मोठी असते, पण मी पदावर रूजू झालो, तेव्हा दररोज वाचन आणि काही प्रमाणात लेखन करायचे ठरवले होते. ती गोष्ट मी रोज पाळतो. यामुळेच आतापर्यंतच या वीसहून अधिक पुस्तकांचे लेखन करू शकतो आहे. यामुळे कामाचा ताण कमी होतोच, शिवाय पुढील कामांसाठी नवीन ऊर्जाही मिळते. दररोज रात्री थोडेफार का होईना; पण वाचन झालेच पाहिजे, या मताचा मी आहे. वाचन केले नाही, तर रूखरूख लागते.

तुम्ही बालसाहित्याकडे कसे वळलात?

– मी तहसीलदार या पदावर रूजू होण्यापूर्वी एका शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत होतो, तेव्हा माझा विद्यार्थ्यांशी संबंध आला. त्यांच्या भावविश्वात मी इतका गुंतलो, की या मुलांसाठी बालसाहित्याकडे वळलो. मोठ्यांसाठी लिहिणारे खूप असतात, पण बालसाहित्याचे लेखक आता शोधूनही मिळत नाहीत, खरे तर लहान मुलांना वाचण्याची गरज अधिक आहे. त्यांना सकस साहित्य उपलब्ध झाले, तर पुढे जाऊन वाचनांची आवड तयार होईल आणि नव्या पिढीचा साहित्याकडे कल वाढेल.

तुम्ही प्रयोगशील बालसाहित्यावर अधिक भर देता; असे का?

– आपल्याकडे राजा-राणी, राक्षस, तात्पर्य कथा, अशा परंपरागत लेखनाला बालसाहित्य संबोधले जाते; पण तसे नाही. बालसाहित्य यातून बाहेर पडणे अपेक्षित आहे. त्यात प्रयोगशीलता यायला हवी. आपल्या आसपास घडणाऱ्या वास्तवादी घटनांतून मुले घडवणे, हा माझ्या लिखाणमागचा मूळ उद्देश आहे. रंजक दुनियेत अडकवून मुले एका विशिष्ट मर्यादिपलीकडे साहित्य वाचणार नाहीत; पण त्यांच्या भाषेत वास्तववादी घटनांचे चित्रण केले, तर त्यांना ते आवडेल, हे लक्षात आल्याने मी वेगवेगळे प्रयोग करणे सुरू केले. यात आणखी एका मुद्द्याची भर म्हणजे मी

बोलीभाषेत साहित्यमांडणीवर भर देतो. लहान मुलांना आपल्या मातीशी जोडण्यासाठी लिखाणात बोलीभाषेचा उपयोग अत्यंत गरजेचा आहे.

तुम्ही बोलीभाषा टिकवण्यासाठी प्रयत्न करीत आहात, त्याविषयी काय सांगाला?

–बोलीभाषा ही माणसाच्या आयुष्याचा अविभाज्य भाग असायला हवी. कोणत्याही भागातील बोलीभाषा टिकवण्यासाठी अधिकाधिक लेखन त्या भाषेत व्हायला हवे. त्या भाषेतील शब्दप्रयोग सर्वांना कळायला हवेत. यासाठी द्वैभाषिक पद्धतीच्या पुस्तकांचा आधार घेतला जाऊ शकतो. मी खान्देशी असल्याने तेथील अहिराणी, लेवागन या बोलीभाषांचा अभ्यास करून त्यातील शब्द लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करतो. हे करताना मी राज्यातील इतरही बोलीभाषांचा अभ्यास करतो. त्या टिकवण्याचा प्रयत्न आगामी काळात करीन. आपल्या पुढच्या अनेक पिढ्यांना बोलीभाषांचा समृद्ध ठेवा मिळायला हवा, अन्यथा आपली नाळ संस्कृतीपासून तुटायला वेळा लागणार नाही.

# लेखकांसाठी सुचना

१. लेखांचा विषय प्रचलित आणि संक्षिप्त असणे आवश्यक आहे.

२. प्रकाशित करणाऱ्या येणाऱ्या लेखांची शब्दमर्यादा ५०० ते १००० असावी आणि लेख संगणकीकृत करून shikshanyatri11@gmail.com, pragatiartsshirpur@gmail.com या मेलवर पाठवावी.

३. संगणकीकृत केलेल्या मुद्रित अक्षरांसाठी (श्रीलिपी देव ७०८) Shree lipi- Dev708 /google marathi/ mangal font फॉन्ट साईज १५ असावे.

४. स्वीकृत करण्यात येणाऱ्या लेखांचे पुनर्संस्कारित करण्याचे सर्व हक्क संपादक मंडळाकडे राहतील.

५. लेखात अद्यावत माहिताचा वापर करून भाषा सुस्पष्ट व समजण्यास सोपी असावी.

६.लेखकाने प्रथम पृथ्वावर लेखाचे शीर्षक, लेखकाचे नाव, पासपोर्ट साईज फोटो, भ्रमणध्वनी व पिनकोडसह पत्ता अवश्य द्यावा.

७. लेख पाठवितांना लेखकांकडून अनेकवेळा टंकलेखनामध्ये चुका होत असल्याचे आढळते, त्यामुळे वाक्यांचा संदर्भ लागत नाही. तरी कृपया लेख पाठवितांना पुन्हा एकदा काळजीपूर्वक वाचन करून पाठवावा.

८. मासिकाच्या वर्गणीचे धनादेश व डिमांड ड्राफ्ट – शिक्षणयात्री या नावाने संपर्क पत्त्यावर पाठवावेत.

संपर्क :शिक्षणयात्री क्रांतीनगर ता.शिरपूर जि.धुळे चलभाष : 8208301001 shikshanyatri11@gmail.com